# सार्वजनिक उपक्रम समिती

( २००५-२००६ )

( अकरावी महाराष्ट्र विधानसभा )

**महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाच्या कामकाजासंबंधात महाराष्ट्र शासनाच्या सन २००२-२००३ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील परिच्छेद क्रमांक ४.१७, ४.१८, ४.१९ व ४.२० यावरील समितीचा**

# पाचवा अहवाल

( दिनांक डिसेंबर, २००६ रोजी विधानसभेस / विधानपरिषदेस सादर केला )

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, नागपूर.

# सार्वजनिक उपक्रम समिती

( २००५-२००६ )

( अकरावी महाराष्ट्र विधानसभा )

**महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाच्या कामकाजासंबंधात महाराष्ट्र शासनाच्या सन २००२-२००३ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील परिच्छेद क्रमांक ४.१७, ४.१८, ४.१९ व ४.२० यावरील समितीचा**

# पाचवा अहवाल

# सार्वजनिक उपक्रम समिती
## (२००५- २००६)
## समिती प्रमुख

(१) श्री. नाना पटोले, वि.स.स.

## समिती सदस्य

(२) श्री. सुरेश वरपूडकर, वि.स.स.
(३) श्री. बशीर मुसा पटेल, वि.स.स.
(४) श्री. रमेश कदम, वि.स.स.
(५) श्री. चंद्रशेखर भोसले, वि.स.स.
(६) श्री. राजवर्धन कदमबांडे, वि.स.स.
(७) श्री. राजेंद्र दर्डा, वि.स.स.
(८) श्री. बंडूभाऊ सावरबांधे, वि.स.स.
(९) श्री. पी.यु.मेहता, वि.स.स.
(१०) श्री. रामप्रसाद कदम-बोर्डीकर, वि.स.स.
(११) श्री. मदन पाटील, वि.स.स.
(१२) श्री. हरिदास भदे, वि.स.स.
(१३) श्री. अरविंद नेरकर, वि.स.स.
(१४) श्री. गुलाबराव पाटील, वि.स.स.
(१५) श्री. प्रतापराव जाधव, वि.स.स.
(१६) श्री. उत्तमप्रकाश खंदारे, वि.स.स.
(१७) श्री. अरुण पाटील, वि.स.स.
(१८) डॉ. विनय नातू, वि.स.स.
(१९) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.
(२०) श्री. विजयकुमार देशमुख, वि.स.स.
(२१) श्री. संजय दत्त, वि.प.स.
(२२) श्री. सदाशिवराव पोळ, वि.प.स
* (२३) रिक्त
(२४) श्री. श्रीकांत जोशी, वि.प.स.
(२५) श्री.अरविंद सावंत, वि.प.स.

*श्री. वसंत काळे, वि.प.स. समिती सदस्य यांचे दिनांक २ फेब्रुवारी, २००६ रोजी निधन झाल्यामुळे रिक्त.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. विलास पाटील, प्रधान सचिव (१)
श्री. दि.वि.चोघले, अतिरिक्त सचिव
श्री. डी.एम.गवळी, समिती अधिकारी

## अनुक्रमणिका


| अनुक्रमांक (१) | तपशील (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| | **प्रस्तावना** | |
| एक | **महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ** (ले.प.अ. २००२-२००३) | |
| | (१) **" अपर्याप्त तारणामुळे नुकसान"** (परिच्छेद क्रमांक ४.१७) | |
| | (२) **"कर्जाचे अनियमित संवितरण"** (परिच्छेद क्रमांक ४.१८ ) | |
| | (३) **"अवर्धनक्षम प्रकल्पाला कर्जाचे संवितरण"** (परिच्छेद क्रमांक ४.१९ ) | |
| | (४) **"पर्याप्त सुरक्षा उपाया शिवाय कर्जमंजूरी"** (परिच्छेद क्रमांक ४.२० ) | |
| दोन | **बैठकीचे परिशिष्ट** | |

# प्रस्तावना

मी, सार्वजनिक उपक्रम समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरुन महाराष्ट्र शासनाच्या सन २००२-२००३ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण चार मधील महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाच्या कामकाजासंबंधात परिच्छेद क्रमांक ४.१७, ४.१८ ४.१९ व ४.२० यावरील समितीचा पाचवा अहवाल (अकरावी महाराष्ट्र विधानसभा) सादर करीत आहे.

उद्योग उर्जा व कामगार विभाग (उद्योग) यांच्याकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनावर व माहितीवर समितीने विचार केला. बुधवार, दिनांक ४ ऑक्टोबर २००६ रोजी महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाच्या प्रतिनिधींची व विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली.

श्री.के.एल. करमुडी, उपमहालेखापाल (वाणिज्यिक लेखा परिक्षा), श्री.पी.पी. लोणकर, वरिष्ठ लेखा अधिकारी यांनी निमंत्रणानुसार समितीच्या बैठकांना उपस्थित राहून समितीला केलेल्या मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांचे आभार मानते. उद्योग उर्जा व कामगार (उद्योग) विभागाचे सचिव श्री. व्ही.के. जयरथ, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक श्री. समिर बिश्वास, उद्योग उर्जा व कामगार विभागाचे (उद्योग) श्री. प्रितम आठवले सहसचिव, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाचे श्री. अय्यर, उपमहाव्यवस्थापक यांनी दिलेल्या संपूर्ण सहकार्याबद्दल समिती त्यांचे सुध्दा आभार मानते.

समितीने ----वार, दिनांक ---- २००६ रोजी झालेल्या बैठकीत या अहवालावर विचार करुन तो काही सुधारणांसह संमत केला.

**नाना पटोले,**
समिती प्रमुख,
सार्वजनिक उपक्रम समिती.

विधान भवन,
मुंबई, ---वार, दिनांक, २००६.

# महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ

## एक : अपर्याप्त तारणामुळे नुकसान -

१.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००२-२००३ च्या (वाणिज्यिक) अहवालातील परिच्छेद क्रमांक ४.१७ मध्ये "अपर्याप्त तारणामुळे नुकसान" यांसंबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले की, अपर्याप्त तारणाशिवाय कर्ज मंजूर करणे व वसुलीची विलंबाने केलेली कारवाई त्यामुळे रुपये १६.५९ कोटी येण्याची वसुली झाली नाही.

महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाने शान इंटरवेल (इंडिया) खाजगी मर्यादित, ठाणे या मध्यम आकाराच्या उद्योगाला त्यांची खेळत्या भांडवलाची गरज भागविण्यासाठी रुपये एक कोटीचे अल्प मुदतीचे कर्ज (एसटीएल) मंजूर व संवितरित (मार्च १९९६) केले होते. एसटीएलवर २३ टक्के प्रतिवर्ष या दराने व्याज देय होते व त्यांची ११ मासिक हप्त्यांमध्ये परतफेड करावयाची होती.

लेखापरीक्षण विश्लेषणात असे निदर्शनास आले की, महामंडळाने एसटीएल संवितरित करतांना सुरक्षेसाठी पर्याप्त घेतले नव्हते व वसुली करण्यामध्ये प्रयत्न केले नाहीत त्याची चर्चा खालील प्रमाणे :-

* रुपये २ कोटी किंमतीचे ५.५ लाख समभाग सुरक्षाठेव म्हणून स्वीकारुन संवितरण करण्यात आले होते. ज्यावेळी संस्थेने परतफेडीमध्ये कसूर केला त्यावेळी त्या समभागांचे मूल्य तात्काळ खूपच कमी झाले होते फक्त रुपये ४.४ लाख एवढेच राहिले होते. यावरुन कर्ज देतांना सुरक्षा म्हणून समभाग स्वीकारणे हे परिणामकारक तारण नव्हते.
* ज्यावेळी संस्थेने प्रदान करण्यात कसूर केला त्यावेळी संस्थेने दिलेली संचालकांची वैयक्तिक हमी कर्ज वसुलीसाठी एकदम अपरिणामकारक शाबित झाली होती.
* कंपनीने दिलेले उत्तरदिनांकित धनादेशदेखील कर्ज वसुलीसाठी अपरिणामकारक ठरले होते.
* एककाने दिलेले उत्तरदिनांकित धनादेश बँकेने जुलै १९९७ पासून अनादरित केले होते. परंतु महामंडळ परिक्राम्य लेख अधिनियम, १९३८ च्या कलम १३८ अंतर्गत

धनादेश अनादरित होण्याबाबत एककाच्या विरुध्द कारवाई करण्यात अपयशी ठरले होते.

* संचालकाच्या वैयक्तिक हमीबाबत महामंडळाने राज्य वित्तीय महामंडळे अधिनियम १९५१ च्या कलम ३१ (१) (अअ) अंतर्गत संकीण अर्ज मात्र जिल्हा न्यायालय, ठाणे येथे मार्च १९९९ मध्ये सादर केला होता. हे प्रकरण न्यायालयात प्रलंबित होते (ऑगस्ट २००३).

कर्ज संवितरित करतांना केलेल्या चुकांमुळे व नंतर कर्जदाराने कर्जपरतफेडीत कसूर केल्यानंतर महामंडळ रुपये ८८.८० लाखाचे मुद्दल व फेब्रुवारी २००३ पर्यंतचे व्याज रुपये १५.७० कोटी वसूल करु शकले नाही. ही बाब शासनाला/व्यवस्थापनाला कळविली (मे २००३) होती, उत्तर मिळाले नव्हते (नोव्हेंबर २००३).

१.२ या प्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमुद केले की,

(१) महामंडळाच्या सक्षम अधिकाऱ्यांनी (संचालक मंडळ) वेळोवेळी मान्य केलेली धोरणे व संबंधित नियमावलीनुसार लघु मुदतीचे कर्ज (Short Term Loan) मंजूर करुन वितरित करण्यात आले. धोरणाचा भाग म्हणुन कर्जमंजूरी व वितरणासाठी शेअर्स तारण म्हणुन स्वीकारण्याचे ठरले. सदर कंपनी कर्ज परत फेडीच्या बाबतीत कसुरदार झाल्यानंतर महामंडळाने कायदेशीर कारवाई सुरु केली आणि SFCS Act च्या कलम ३१ (१) (aa) खाली संचालक / हमीदार यांच्या विरुध्द १९९७ साली जिल्हा न्यायालय, ठाणे येथे कर्जवसुलीसाठी दावा दाखल केला. महामंडळाने मुंबई उच्च न्यायालयात Winding up Petition सुध्दा ९/१२/१९९८ रोजी दाखल केले आहे. अशाप्रकारे सर्व कायदेशीर उपाययोजना केल्यानंतर कर्जवसुलीसाठी शेवटचा उपाय म्हणुन शेअर्सची विक्री करणे महामंडळाला शक्य होते. परंतु त्या कालावधीत शेअर्सच्या दरात मोठ्या प्रमाणात घट झाल्याने सदर प्रस्तावास प्राधान्य देण्यात आले नाही.

२) हे खरे आहे कि ज्या वेळी सदर कंपनी विरुध्द महामंडळाने कायदेशीर उपाययोजनेचा आधार घेतला आणि कंपनीचे संचालक / हमीदार यांच्या विरुध्द १९९७ साली जिल्हा न्यायालय, ठाणे येथे दावा दाखल केला. परंतु दरम्यानच्या कालावधीत कंपनीने BIFR कडे अर्ज केल्यामुळे सदर दाव्याचा वेगाने पाठपुरावा करण्यात आला नाही. महामंडळाने नंतर BIFR कडे अशी विनंती केली की, SICA च्या कलम २२ (१) खाली हमीदारांच्या विरुध्द कारवाई करण्यास महामंडळाला परवानगी देण्यात यावी. BIFR ने आतापर्यंत २०/११/२००३ च्या निकालाद्वारे सर्व Secured Creditors ना कंपनीच्या विरुध्द कर्जवसुलीसाठी कारवाई करण्याची परवागनी दिली. त्यानुसार महामंडळाने आपल्या वकिलांना जिल्हा न्यायालय, ठाणे येथे दाखल केलेल्या दाव्यासंबंधी पाठपुरावा करण्यास सांगितले. सदर दावा अजुन सुनावणीसाठी प्रलंबित आहे.

३) उत्तर दिनांकित धनादेशा संबंधातील महालेखाकारांचा अभिप्राय वस्तुस्थिती दर्शक आहे. पुढील तारखांचे चेक हे दिलेल्या कर्जासाठी सुरक्षित व खात्रीपुर्वक तारण (As Safeguard and Absolute Security) म्हणून सिध्द होऊ शकत नाहीत. त्यांचा उपयोग सिमित आहे. उदा. जर चेक बँकेत वटले नाहीत तर Negotiable Instruments Act च्या कलम १३८ खाली कारवाई करणे शक्य आहे. परंतु सदर कारवाईचा निकाल लागुन कर्जवसुलीच्या एकुण प्रक्रियेस दीर्घ कालावधी लागत असल्याने सदर उपाययोजना परिणामकारक होत नाही.

४) सदर मुद्यावर वरील "३" मध्ये खुलासा करण्यात आला आहे. याबाबतीत असेहि नमुद करण्यात येते की, चेक बँकेत न वटल्यास सहसा महामंडळाद्वारे NI Act च्य कलम १३८ अंतर्गत कारवाई करण्यात येते. परंतु या प्रकरणात महामंडळ आणि कंपनी यांच्यात चर्चा चालु असल्याने NI Act खाली कारवाई करण्यात आली नाही.

५) महामंडळाच्या कर्जपरत फेडीच्या बाबतीत कसुरदार झाल्याने महामंडळाने कंपनी व संचालक/हमीदार यांच्या विरुध्द पुढील कारवाई केली आहे.

अ) मुंबई उच्च न्यायालयात Winding up Petition १६/९/१९९७ रोजी दाखल करण्यात आले आहे. मात्र सदर पिटीशन अजुन सुनावणीसाठी आलेले नाही.

ब) महामंडळाने जिल्हा न्यायालय, ठाणे येथे SFCs Act च्या कलम ३१ (१) (aa) खाली (Misc Appln No.२४८ of १९९९) संचालक हमीदार यांच्याविरुध्द दावा दाखल केला आहे. कंपनीने BIFR कडे अर्ज केला असुन सदर अर्जाचे क्र.११४/१९९८ म्हणुन नोंद झाली आहे. त्यामुळे जिल्हा न्यायालय, ठाणे येथील दाव्यावरील कारवाई स्थगित झाली. BIFR ने आपल्या २०/११/२००३ च्या निकालानुसार सर्व Secured Creditors ना कायद्याच्या कलम २२ (१) नुसार कंपनी व हमीदार यांच्याविरुद कर्जवसुलीसाठी दावे चालु ठेवण्याचा आदेश दिला व असे स्पष्ट केले की कोणतीही डिक्री मिळाली तर त्यासंबंधी BIFR च्या पूर्व परवानगीशिवाय अंमलबजावणी करण्यात येऊ नये.

क) BIFR कडुन दिनांक २०/११/२००३ चा आदेश/ इतिवृत्त प्राप्त झाल्यानंतर महामंडळाने दिनांक २०/१/२००६ च्या पत्राद्वारे व आपल्या वकिलांना जिल्हा न्यायालयात सुनावणी ठेवण्यासंबंधी अर्ज करण्यास सांगितले. परंतु जिल्हा न्यायालयात मोठ्या प्रमाणात दावे प्रलंबित असल्याने सदर दाव्याची सुनावणी होऊ शकली नाही व वेळोवेळी पुढची तारीख देण्यात आली. शेवटची सुनावणी दिनांक ३०/१०/२००४ रोजी झाली.

१.३ महामंडळाच्या वरील अभिप्रायाशी शासनाने सहमती दर्शविली आहे.

१.४ या प्रकरणी समितीने उद्योग विभागाचे सहसचिव व महामंडळाचे व्यवस्थायकीय संचालक यांची दिनांक ४ ऑक्टोबर २००६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी, या प्रकरणी सविस्तरपणे माहिती देताना व्यवस्थापकीय संचालकांनी सांगितले की, कर्जवितरणा संबंधीची मार्गदर्शक तत्वे वेळोवेळी महामंडळाने घालून दिलेली आहेत. तसेच कर्ज वितरणासंबंधीची पुस्तिका देखिल तयार केलेली आहे. या प्रकरणात कर्ज वितरण करताना या कंपनीचे समभाग तारण म्हणून घेऊन कर्ज वितरीत केले आहे. परंतू दुर्देवाने कर्जवाटपासंबंधीच्या मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन झाल्यामुळे अडचण निर्माण झाली. तसेच डिसेंबर, २००३ मध्ये यासंबंधी रिट याचिका दाखल केली होती.

ही याचिका आपल्याकडे बी.आय.एफ.आर.बेंच नसल्यामुळे उच्च न्यायालयात दाखल करावी लागली त्यावेळी स्थगिती मिळालेली आहे. बी.आय.एफ.आर. कडून नोव्हेंबर २००३ मध्ये स्थगिती मिळाल्यानंतर जानेवारी २००६ मध्ये महामंडळाने त्याबाबत हालचाल केली. बी.आय.एफ.आर.ने जिल्हा न्यायालयात अर्ज करण्यास सांगितले. परंतू तेथे दावे प्रलंबित असल्यामुळे त्याची सुनावणी होऊ शकली नाही. बी.आय.एफ.आर.ने आदेश दिल्यानंतर त्याची अंमलबजावणी करण्यासाठी विलंब लागला, चुकीचे तारण घेऊन कर्जवाटप करण्यात आले. तसेच महामंडळाच्या कर्जवसुलीच्या बाबतीत कसूर करणारे अधिकारी, संचालकमंडळ व कंपनी यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली अथवा करण्यात येणार आहे या समितीच्या प्रश्नास उत्तर देताना उपमहाव्यवस्थापक यांनी सांगितले की, दिनांक २०/११/०३ रोजी बीआयएफआरने सांगितले होते की, कंपनी व्हायेबल नसल्यामुळे ती वाईंडअप करुन कायदेशीर कारवाई करावी. परंतू कंपनीने उच्च न्यायालयात याचिका दाखल करुन या कारवाईला स्थगिती मिळवली. कंपनीला सुरुवातीला शॉर्टटर्म लोन दिले होते. त्याचा व्याजदर २०% च्या वर होता. व्यवस्थापकीय संचालकांनी एका प्रश्नासंबंधी अशी माहिती दिली की, राज्य वित्त महामंडळाच्या या संचालक मंडळात ११ वित्तीय तज्ञ लोक आहेत. मंडळाचे चेअरमन "सीडबी" कडून नेमले जातात. त्यांचे दोन सभासद, आयडीबीआयचे दोन सभासद, शासनाचा एक प्रतिनिधी आणि वित्तिय कामाचा अनुभव आहे अशा एफबीसिकॉमचा नॉमिनी व डेव्हलपमेंट कमिश्नर, उद्योग हे नॉमिनी आहेत. या प्रकरणी पहिले शॉर्ट टर्म लोन असल्याने दुसरे लोन देताना सिक्यूरीटी म्हणून दुप्पट किंमतीचे शेअर्स घेऊन हे कर्ज वाटप केले. पुढे त्यांनी अशी माहिती दिली की, ३१ ऑक्टोंबर १९९१ ला संचालक मंडळाने एक मार्गदर्शक तत्त्वांचा ठराव पास केला. त्याला अनुसरुन कंपनीचे शेअर्स सिक्यूरीटी म्हणून घेऊन कर्ज मंजूर करता येते. त्यावेळी एका शेअरची किंमत २०९ रुपये होती. म्हणून दुप्पट शेअर्स तारण घेऊन कर्जवाटप करण्यात आले. त्यावेळी महामंडळाची कर्जाची मर्यादा रु.२.४० कोटी एवढी होती. परंतू जसे अर्ज येतात तसे कर्ज मंजूर करण्यात येते. संचालक मंडळाच्या निर्णयानुसार "ब्लू चिप" कंपनीचे शेअर्स घेणे आवश्यक असताना तसे शेअर्स न घेता

इतर प्रकारचे शेअर्स घेतले. हे महामंडळाने कसे मान्य केले या प्रश्नाला उत्तर देताना सांगण्यात आले की, कंपनीने दिलेले शेअर्स मुंबई शेअर बाजारात नोंदविण्यात आले होते आणि त्यावेळी त्यांची किंमत चांगली होती. त्या वेळी त्या कंपनीच्या संचालकापदी श्री. श्रीनिवासन, श्री.शिवकुमार, श्री.एस.पी.अगरवाल इत्यादी होते व कंपनीचा कॉरयुगेटेड बॉक्सेस तयार करण्याचा उद्योग होता. कंपनीने दिलेले उत्तर दिनांकीत धनादेश वटले नसताना कंपनीविरुध्द कारवाई न करण्याचा निर्णय कोणी घेतला या प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी असे सांगितले की, त्यावेळी महामंडळाचे जनरल मॅनेजर श्री. पी.बी. कदम हे होते व त्यांनी कोणाही विरुध्द कारवाई न करण्याचा निर्णय घेतला होता व त्याला संचालक मंडळाने मान्यता दिली होती. श्री. आर.एम.प्रेमकुमार हे त्यावेळी व्यवस्थापकीय संचालक म्हणून होते. त्यांनी पुढे असेही सांगितले की, सदरहू कंपनीला ५/६ महिन्यांमध्ये ऑर्डर पूर्ण करावयाची होती व म्हणूनच त्यांनी वर्कींग कॅपिटलच्य स्वरुपात शॉर्ट टर्म लोन मागितले होते. त्यांच्याकडे बजाज, हिंदुस्तान पेट्रोलियम इ. सारख्या कंपन्यांच्या आर्डर्स होत्या व त्या त्यांना जलदगतीने पूर्ण करावयाच्या होत्या. कंपनीने दिलेली ही माहिती पडताळून पाहिली होती काय या प्रश्नाला त्यांनी नकारात्मक उत्तर दिले.

१.५ **अभिप्राय व शिफारशी :-**

महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाने शान इंटरवेल (इंडिया) खाजगी मर्यादित, ठाणे या मध्यम आकाराच्या उद्योगाला त्यांची खेळत्या भांडवलाची गरज भागविण्यासाठी रुपये एक कोटीचे अल्पमुदतीचे कर्ज मंजूर करुन मार्च १९९६ मध्ये संवितरीत केले होते. ११ मासिक हप्त्यांमध्ये त्याची परतफेड करावयाची होती. याप्रकरणी महामंडळाने कंपनीला कर्ज वितरीत करताना सुरक्षेसाठी पर्याप्त तारण घेतले नव्हते व वसूली करण्याचेदेखिल प्रयत्न केले नाहीत. परिणामी फेब्रुवारी २००३ पर्यंत मुद्दल व व्याज मिळून रु.१५.७० कोटीची वसूली होऊ शकली नाही. कर्ज परतफेडीच्या बाबतीत महामंडळाने कसूरदार कंपनीविरुध्द १९९७ मध्ये जिल्हा न्यायालय, ठाणे येथे कायदेशिर कारवाई सुरु केली. डिसेंबर १९९८ मध्ये मुंबई उच्च न्यायालयात समापन (Winding-up) पिटीशन दाखल केले. शेवटचा उपाय म्हणून कंपनीच्या शेअर्सची विक्री

करणे महामंडळास शक्य होते. परंतु यावेळेपर्यंत शेअर्सच्या दरात मोठ्या प्रमाणात घट झाली होती व महामंडळाने तो पर्याय स्विकारला नाही. महामंडळाने १९९९ मध्ये कंपनीचे हमी देणारे संचालक यांच्याविरुध्द ठाणे कोर्टात दावा दाखल केला. दरम्यान कंपनीने बी.आय.एफ.आर. कडे अर्ज केला त्यामुळे ठाणे कोर्टातील दाव्याचा महामंडळाने पाठपूरावा केला नाही. बी.आय.एफ.आर. ने २००३ मध्ये हमीदारांविरुध्द कर्जवसूली दावे करण्यास परवानगी दिली मात्र त्यानंतर महामंडळाने जलदगतीने कारवाई करण्याऐवजी २००६ मध्ये आपल्या वकिलांना कोर्ट प्रकरणाच्या सूनावणीचा पाठपूरवा करण्यास सांगितले. कंपनीकडून कर्जवसूलीसाठी पुढील तारखांचे धनादेश घेण्यात आले होते. परंतु त्यांचाही उपयोग महामंडळाने केलेला नाही. त्याबाबत महामंडळाचे मत असे आहे की, हे धनादेश सुरक्षीत व खात्रीपूर्वक तारण म्हणून सिध्द होऊ शकत नाही. कारण ते बँकेत वटले नाहीत तर एनआय ॲक्टच्या १३८ खाली कारवाई करणे शक्य होते. परंतु यासाठी दीर्घ कालावधी लागतो. तसेच कंपनीबरोबर चर्चा चालू असल्याने या कायद्याखाली कारवाई करण्यात आली नाही. एकंदरीतच हे सर्व प्रकरण सदरहु उद्योग, महामंडळाचे अधिकारी तसेच महामंडळाचे संचालक मंडळ यांनी संगनमताने केले असल्याचा समितीस दाट संशय आहे. अन्यथा तारण म्हणून ज्यांचे भाव केंव्हाही घसरु शकतात असे शेअर्स घेण्याला संचालक मंडळाने मान्यता दिलीच नसती. दूसरे म्हणजे ज्यावेळी उद्योजकाने दिलेले चेक वटले नाहीत त्यावेळीच त्यांचेविरुध्द कायदेशिर कारवाई झाली पाहिजे होती. अशी कायदेशिर कारवाई करणे तर दूरच राहिले परंतू महामंडळाने या प्रक्रियेस वेळ लागत असल्यामुळे कारवाई न करण्याचा आगळा-वेगळा निर्णय घेतला व उद्योजकाला पाठीशी घालण्याचा प्रयत्न केला. उद्योजकाच्या हमीदारांविरुध्द देखिल सुमारे ४ वर्षे कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. मुळातच एखाद्या संचालकाच्या वैयक्तिक हमीला महामंडळाने कशी मान्यता दिली हा प्रश्न उपस्थित होतो. हे कर्ज अल्पमूदत कर्ज होते व त्याची ११ हप्त्यात परतफेड करावयाची होती. त्यामुळे उद्योजकाने जेव्हा पहिला हप्ताच भरला नाही त्यावेळी महामंडळाने कारवाई केली असली तर कदाचित आज जेवढे झाले तेवढे नुकसान झाले नसते. ही वस्तुस्थिती लक्षात घेता समितीची

यासंबंधात शिफारस आहे की, या सर्व गैरव्यवहाराची महामंडळाने तसेच शासनाने खास अधिकारी नेमून चौकशी करावी. या आर्थिक हानिस जे-जे कारणीभूत आढळून येतील त्यांचेवर जबाबदारी निश्चित करुन त्यांचेकडून महामंडळाचे झालेले नुकसान भरुन घेण्याची कारवाई करण्यात यावी. या प्रकरणी सुरु असलेल्या कोर्ट खटल्यांचा कसोशिने पाठपूरावा करुन हे प्रकरण लवकरात लवकर कसे निकालात काढता येईल याची काळजी महामंडळाने घ्यावी. इतःपर अशा प्रकारे कर्ज देण्याचे महामंडळाने थांबवावे. भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती झाल्यास त्याची गंभिरतेने दखल घेतली जाईल याची महामंडळाने तसेच शासनाने नोंद घ्यावी.

या प्रकरणी केलेल्या कारवाईची माहिती समितीस तीन महिन्यांचे आत देण्यात यावी.

## दोन : कर्जाचे अनियमित संवितरण -

२.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००२-२००३ च्या (वाणिज्यिक) अहवालातील परिच्छेद क्रमांक ४.१८ मध्ये **"कर्जाचे अनियमित संवितरण"** यांसंबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की संवितरणपूर्व अनिवार्य अटींचे पालन न केल्यामुळे व यंत्रसामुग्रीच्या प्राप्तीची तपासणी न केल्यामुळे रुपये १.७४ कोटीचे नुकसान झाले होते.

महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाने (महामंडळ) किरण मेडिकेअर खाजगी मर्यादित यांना इलेक्ट्रो वैद्यकीय उपकरणे संस्थापित करण्यासाठी रुपये ९० लाखाची दोन कर्जे मंजूर केली होती. (सप्टेंबर-नोव्हेंबर १९९१). एककाच्या विरुध्द रुपये १.८९ कोटीचे येणे (मुद्दल रुपये ७७ लाख : व्याज व खर्च रुपये १.१२ कोटी) प्रलंबित होते (नोव्हेंबर १९९९) वरील व्यवहाराबाबतचे लेखापरीक्षण शेरे खालील प्रमाणे आहेत.

* मंजूरीच्या अटींमध्ये स्पष्टपणे विहित केले होते की, कर्जाचे संवितरण करण्यापूर्वी एककाने रुपये ४९ लाखाचे भाग भांडवल उभारुन ते समभाग महामंडळाकडे सुरक्षाठेव म्हणून तारण ठेवावयाचे होते. परंतु ही महत्त्वाची अट परिपूर्ण केलेली नसतांनाही कर्जाचे संवितरण करण्यात आले होते.

* महामंडळाने मे. विप्रो जीई मेडिकल सिस्टीम (पुरवठाकार) यांना प्रोफार्मा बिजकाच्या आधारावर रुपये ८५ लाखाने प्रदान दिले (जून १९९२) होते. पुरवठाकाराने दोन यंत्रांसाठी अग्रीम दिलेले असतांनाही फक्त एकच यंत्र एककाला पुरविले होते. प्रोफार्मा बिजकाच्या आधारावर कर्जदाराने पुरवठाकाराने दिलेल्या अग्रीमाची तपासणी न करताच पैशाचे संवितरण करणे हे याबाबतीत घालून दिलेल्या पध्दतीचे उल्लंघन करणारे होते.

* संपूर्ण वैद्यकीय उपकरणे कर्जदाराला १५ दिवसांच्या आत पुरवठा करण्याचे १८ जून १९९२ च्या पत्रात स्पष्टपणे नमूद करण्यात आले होते. महामंडळाने पुरवठा करण्यात आलेल्या उपकरणांची त्वरीत पुरवठा स्थिती निर्धारित करुन पुरवठाकाराच्या विरुध्द उपकरणांची पोहचवणी न करता / अग्रिम परत करणे याबाबत त्वरीत फौजदारी कारवाई सुरु करणे आवश्यक होते. संवितरणानंतरची तपासणी फक्त

सप्टेंबर १९९८ मध्ये म्हणजे सहा वर्षानंतर करण्यात आली होती. झालेल्या अत्यंत विलंबामुळे महामंडळ ती यंत्रसामुग्री जून २००२ मध्ये रुपये १५ लाख एवढ्या अत्यल्प किंमतीला विकू शकली होती.

या अनियमिततांच्या परिणाम स्वरुप रुपये १.७४ कोटीची रक्कम (मुद्दल रुपये ७७ लाख : व्याज : रुपये ९७ लाख) वसूल करावयाचे राहिले होते (सप्टेंबर २००३).

महामंडळाने म्हटले होते (ऑगस्ट २००३) की यंत्रसामुग्री खरेदी करुन संस्थापित केलेली आहे. या सनदी लेखापालाच्या प्रमाणपत्राच्या आधारावर प्रोफार्मा बिजकांवर प्रदान देण्यात आले होते. हे उत्तर समर्थनीय नव्हते कारण सनदी लेखापरीक्षकांच्या प्रमाणपत्रावर विसंबून राहण्याऐवजी महामंडळाने आवश्यक ती तपासणी स्वतःच करणे आवश्यक होते.

ही बाब शासनाला कळविली (मे २००३) होती, उत्तर मिळाले नव्हते (नोव्हेंबर २००३)

२.२ या प्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमुद केले आहे की,

१) मे. कृष्णा मेडिकेअर प्रा.लि. ने कृष्णा हॉस्पिटल अँड मेडिकल सेंटर, कराड येथे बसविण्यासाठी इलेक्ट्रो मेडिकल इक्विपमेंट खरेदी करण्याच्या हेतुने रु. १.३९ कोटी रुपयांच्या प्रकल्पासाठी कर्जाचा प्रस्ताव दिला होता. सदर प्रकल्प, उद्योगघटकाचे रु.४९ लाखांचे भांडवल आणि महावित्तकडुन उर्वरित रु. ९० लाखांचे कर्ज यांच्या आधारे उभारण्यात येणार होता. रु. १३९ लाखांच्या सदर प्रकल्पासाठी कंपनीने प्रथम रु.९० लाखांचे कर्ज महावित्त व सिकॉम यांच्याकडुन घेण्याचे योजिले होते. महामंडळाच्या संचालक मंडळाने सुरवातील रु.५५ लाखांचे मुदत कर्ज दिनांक ३/१/१९९१ रोजी मंजुर केले. त्यानंतर कंपनीने अशी विनंती केली की, दोन वित्तीय संस्थाकडुन कर्ज घेण्यासाठी लागणाऱ्या प्रक्रियेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी एकाच संस्थेकडून कर्ज घेणे सोयीचे ठरेल. महामंडळाच्या संचालक मंडळाने नंतर २९/११/१९९१ रोजी रु.३५ लाख एवढे अतिरिक्त मुदत कर्ज मंजुर केले.अशाप्रकारे एकूण रु.९० लाखांचे कर्ज कृष्णा

हॉस्पिटल अँड मेडिकल रिसर्च सेंटर, कराड येथील मेडिकल डायग्नोस्टिक सेंटरसाठी मंजुर करण्यात आले.

२) महामंडळाने एकुण रु.९० लाखांची दोन कर्जे (सप्टेंबर व नोव्हेंबर १९९१) सदर उद्योगघटकाला मंजुर केली. कर्जमंजुरीच्या एका अटीनुसार उद्योगघटकाने रु. ४९ लाखांचे भागभांडवल उभारुन ते शेअर्स महामंडळाकडे तारण म्हणून ठेवणे आवश्यक होते. महामंडळाने जुन १९९२ मध्ये कर्ज वितरित केले. त्यावेळी कंपनीने जरी भागभांडवल उभारले नव्हते तरी महामंडळाने कंपनीकडुन असे हमीपत्र घेतले होते की, सदर अटीची पूर्तता १५ दिवसांच्या कालावधीत करण्यात येईल.

कर्जमंजुरीच्या दिनांक २७ सप्टेंबर १९९१ च्या पत्रातील अटीप्रमाणे कंपनीने एकुण ४९ लाख रुपयांचे भाग भांडवल उभारुन श्री. व सौ. मिरचंदानी आणि मे. क्लासिक सिक्युरिटीझ यांच्या नावावर देण्यात येणारे ४४ लाख रुपयांचे शेअर्स महामंडळाकडे तारण (pledge) म्हणुन ठेवण्यात येणार होते. त्यावेळी कंपनीचे अधिकृत भाग भांडवल (Authoritied Capital) रु.२५ लाख व भरणा झालेले भाग भांडवल ( Paid-up capital ) रु.१० लाख होते व रु.४४ लाख Unsecured Loan होते. कंपनीने आपले भागभांडवल रु.४९ लाख एवढे वाढविण्याचे व त्याबाबतीत सर्टिफिकेट सादर करण्याचे आश्वासन दिले होते.तसेच शेअर सर्टिफिकेटस तयार करुन करण्यासंबंधीची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी १५ दिवसांचा कालावधी मागुन घेतला होता.

कंपनीची सदर विनंती व्यवस्थापकिय संचालकांनी १७/६/१९९२ रोजी मंजुर केली होती. सी.ए.नी दिलेल्या दि. १८/६/१९९२ च्या सर्टिफिकेट प्रमाणे कर्जवितरणाच्या तारखेपासुन १२ दिवसांनंतर कंपनीने एकुण ४९ लाख रुपयांचे भांडवल आणि ५ लाख रुपयांचे Unsecured Loan कर्जाच्या दि.३१/७/१९९२ रोजी केलेल्या दुसऱ्या हप्त्याच्या वितरणाच्या वेळी उभारले. कंपनीने आपल्या ३१/७/१९९२ च्या पत्रासोबत श्री. डी.ए. मिरचंदानी, सौ. विजया मिरचंदानी आणि

क्लासिक सिक्युरिटीझ प्रा. लि. यांच्या नावावरील शेअर्स महामंडळाकडे सुपुर्द केले.

३) उद्योगघटकाने मे १९९२ मध्ये एकुण १.३० रुपयांचे दोन Proforma Invoices (सी.टी.स्कॅनर व कॅमेरा : रु. ०.९१ कोटी, कलर डॉपलर सिस्टिम : रु.०.४५ कोटी) मे Wipro GE Medical System Ltd. Mumbai कडून मेडिकल इक्विपमेंटसच्या खरेदीसाठी दिले. महामंडळाने कर्जवितरणाच्या मार्गदर्शक तत्वांचे पूर्णतः पालन न करुन कर्जाची रक्कम जुन/जुलै १९९२ मध्ये मशीनरी सप्लायरला दिली. मार्गदर्शक तत्त्वानुसार कंपनीने अग्रीम रकमेचा भरणा इक्विपमेंट सप्लायरकडे केल्याचे तपासून नंतरच महामंडळाने उर्वरित रकमेसाठी चेक देणे आवश्यक होते.

मशिनरी सप्लायरना Proforma Invoice च्या आधारे रक्कम देण्यासंबंधी महामंडळाच्या "Guidelines for availing loan disbursement from MSFC" च्या पुस्तिकेत पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे. कर्जदार स्वेच्छेने एखाद्या मशीनरी सप्लायरकडे प्लँट अँड मशीनरीसाठी मागणी नोंदवु शकतो. (मात्र सदर मशीनरी सप्लायरवर महामंडळाने बंदी घातलेली नसावी - Black Listed) कर्जदाराने सदर सप्लायरला अग्रीम रक्कम देऊन महामंडळाकडे Proforma Invoice पाठवावा व अशी विनंती करावी व अधिकार प्रदान करावा की मंजुर झालेल्या कर्जापैकी उर्वरित रक्कम सप्लायरला द्यावी. सदर अधिकार पत्राचा विहित नमुना महामंडळाच्या मुख्य विभागीय कार्यालयांत उपलब्ध आहे. Proforma Invoice मध्ये प्लँट अँड मशीनरीचे पूर्ण वर्णन, संख्या, दर, एकुण किंमत, कर कर्जदाराने अग्रीम रक्कम भरली असल्यास त्याची माहिती व उर्वरित देय रक्कम तसेच पुरविण्याचा कालावधी व सप्लायरने दिल्या असल्यास इतर शर्ती व अटी यांचा उल्लेख असावा. अशा प्रकारचा Proforma Invoice प्राप्त झाल्यानंतर कर्जदाराने मशीनरी, डिलिव्हरीसाठी तयार असल्याची खात्री करुन घ्यावी. महामंडळसुध्दा सप्लायरकडे यासंबंधी खात्री करुन घेऊ शकते. कायदेशीर दस्तऐवजांची पूर्तता झाल्यानंतर मशीनरी

सप्लायरला परस्पर चेक पाठविला जातो व चेकसोबत पाठविलेल्या Letter of undertaking मध्ये इतर बाबींबरोबर असाहि उल्लेख असतो की, जर कर्जदाराने कोणत्याही कारणामुळे मशीनरीचा स्वीकार विशिष्ट कालावधीत केला नाही तर महामंडळाकडे चेक रद्द करण्यासाठी परत पाठविण्यात यावा. महामंडळाद्वारे मे. Wipro GE Medical System Ltd. यांच्या दि.२८/५/९२ च्या Proforma Invoice च्या आधारे व मशीनरी सप्लायरला अग्रीम रक्कम दिल्यासंबंधी दि.८/६/१९९२ च्या सी.ए.सर्टिफिकेट च्या आधारे रक्कम वितरित करण्यात आली. कंपनीद्वारे असेही कळविण्यात आले की, मशीनरी डिलिव्हरीसाठी तयार झाली आहे. त्यासंबंधी श्री. मिरचंदानी यांनी मानद सचिवाशी चर्चा केल्याचे दिसुन येते. (संदर्भ महामंडळाच्या तत्कालीन कोल्हापुर विभागीय व्यवस्थापकांच्या सचिवाचे दि.२२.६.१९९२ चे पत्र.)

४) चेक दिल्यानंतरसुध्दा महामंडळाने मशीनरी प्रत्यक्ष जाग्यावर स्थापित झाल्याची खातरजमा करुन घेतली नाही कारण सप्टेंबर १९९८ पर्यंत वितरणानंतरची पहाणी (Post Disbursement Inspection) करण्यात आली नव्हती.

महामंडळाद्वारे M/s Wipro GE Medical System Ltd. यांना रु.८५ लाख एवढी रक्कम देण्यात आली त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| **खरेदीची तारीख** | **रक्कम** |
|---|---|
| १८/६/१९९२ | रु. ८० लाख (Wipro) |
| ५/८/१९९२ | रु.८ लाख (रु.५ लाख Wipro साठी) |

दि. २९/७/१९९२ च्या सी.ए.सर्टिफिकेटवरुन असे दिसुन येते की, एकुण मशीनरीचे सर्व भाग उदा. १.Ultrasound Scanner. १. C.T.Scanner व Colour Doppler खरेदी करुन मे. कृष्णा मेडिकेअर, कराड यांच्या इमारतीत स्थापित करण्यात आले आहेत. कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, कर्ज वितरणानंतर कोणतीही पाहणी (Post. Disbursement Inspection) करण्यात आली नव्हती. मात्र विभागीय व्यवस्थापकांच्या दि.१९/६/१९९२ च्या अर्धशासकीय पत्रावरुन स्पष्ट होते की सदर मशीनरी दि.२५/६/१९९२ रोजी

कराड येथे आणण्यात आली होती आणि एका आठवड्याच्या कालावधीत ती स्थापित करण्यात येईल व नंतर पंधरा दिवसात Inspection करण्यात येईल.

५) वितरणानंतर केलेल्या पाहणीत असे दिसुन आले की, कंपनीने फक्त मशीनरी (C.T.Scanner) खरेदी केली होती. महामंडळाने नोव्हेंबर १९९८ मध्ये मशीनरी सप्लायरकडे याबाबतीत विचारणा केली असता असे कळले की, कंपनीने फक्त एकच मशीनरीसाठी मागणी (Order) नोंदविली होती व त्यानुसार पुरवठा करण्यात आला होता. महामंडळाला मशीनरी सप्लायरविरुध्द कोणतीही कायदेशीर कारवाई सुरु करणे शक्य नव्हते कारण प्रकरण Time bar झाले होते. सदर मशीनरीची संपूर्ण किंमत महामंडळाने वितरित केलेल्या रकमेतुन वळती करण्यात आली. त्यापूर्वी असे कळवण्यात आले होते की, कंपनी C.T.Scanner व Colour Doppler आयात करणार होती, परंतु परदेशी सप्लायर (Siemens Ltd) सदर मशीनरी पाठवु न शकल्यामुळे कंपनीने C.T.Scanner व Colour Doppler M/s Wipro GE Medical System Ltd. या देशांतर्गत सप्लायरकडुन घेण्याचे ठरविले व महामंडळाने त्यास मान्यता दिली.

मशीनरीच्या खरेदीतील सदर बदल महामंडळाने मान्य केल्यामुळे Whole Body CT SCanner, Cassettless Multiformat Camera आणि Colour Doppler मशीनरीसाठी एकुण रु.१३६ लाख Proforma Invoice च्या आधारे देण्यात आले, परंतु मशीनरी सप्लायरने फक्त रु.८५ लाख किंमतीची C.T.Max ६६० Whole Body CT Scanner System ही एकच मशीनरी पाठविली.

कोल्हापूर विभागीय कार्यालयाने सप्टेंबर १९९८ मध्ये केलेल्या पाहणीत असे दिसुन आले की, Cassettless Multiformat Camera आणि १ Colour Doppler System कि ज्यासाठी रक्कम भरण्यात आली होती. सदर हॉस्पिटलमध्ये स्थापित करण्यात आली नव्हती. त्यामुळे कोल्हापूर विभागीय कार्यालयाने M/s Wipro GE Medical System Ltd. या मशीनरी

सप्लायरकडे दि.९/११/१९९८ च्यापत्राद्वारे विचारणा केली व त्यांचे दि.१८/६/१९९२ च्या पत्रातील कलमे व अटी यांच्याकडे लक्ष वेधले की ज्या पत्रासोबत Proforma Invoice च्या आधारे Equipments साठी चेक पाठविण्यात आले होते. या पत्राला उत्तर देताना मशीनरी सप्लायरने असे कळविले की त्यांनी खरेदीची रक्कम मिळालेल्या मशीनरीचा पुरवठा केला होता. महामंडळाने चेकसोबत पाठविलेल्या दि.१८/६/१९९२ च्या पत्रातील अटी त्यांनी चेक स्वीकारल्याने त्यांना बंधनकारक असल्याचे त्यांनी अमान्य केले. महामंडळाने या मुद्दयांवर कायदेशीर कारवाई करण्याच्या हेतुने विचार केला व नंतर Limitation Period ही बाब लक्षात घेऊन सप्लायरविरुध्द कायदेशीर कारवाई सुरु न करण्याचे ठरविले.

६) सदर युनिट कसुरदार झाल्याने व थकबाकीची रक्कम (१५/११/१९९९ पर्यंत) रु.१.८९ कोटी (मुद्दल रु.०.७७ कोटी, व्याज व खर्च रु.१.१२ कोटी) झाल्याने महामंडळाने SFCs Act च्या कलम २९ नुसार मशींनरीचा ताबा घेण्यासाठी नोटीस बजावली, परंतु मशीनरी ज्यांच्या ताब्यात होती त्या कृष्णा चॅरिटेबल ट्रस्ट, कराड यांनी महामंडळाविरुध्द मशिनरीचा ताबा घेण्यास प्रतिबंध करण्यासाठी दावा दाखल केला. कलम २९ खाली दि.२१/९/१९९९ रोजी नोटीस पाठवुन दि.१४/१०/१९९९ रोजी मशीनरी ताब्यात घेण्यात येईल असे महामंडळाने कळविले होते. सदर नोटीस मिळाल्यानंतर कृष्णा चॅरिटेबल ट्रस्ट यांनी सातारा येथील न्यायालयात महामंडळाला मशीनरी ताब्यात घेण्यास प्रतिबंध करण्यासाठी दावा दाखल केला. महामंडळाला ट्रस्टच्या वकिलांकाडुन बेकायदेशीर प्रवेश (tresspass) संबंधी नोटीस मिळाली होती. त्यासंबंधी महामंडळाने दि.१३/१०/१९९९ रोजी आपली बाजु मांडली. माननीय न्यायमूर्तींनी दोन्ही पक्षकारांच्या वकिलांना तडजोडीची शक्यता अजमावण्याच्या हेतुने आपल्या अशिलांना हजर राहण्यास सांगावे असा आदेश दिला त्यानुसार ट्रस्टने दि.२०/१०/१९९९ च्या पत्राद्वारे सदर प्लँट व मशीनरी उदा. C.T. Max ६४० Whole Body Scanner System and Ultra Sound Scanner जसे

आहे त्या स्थितीत विकत घेण्यासाठी रोख रु.१५ लाखांचा प्रस्ताव दिला. सदर प्रस्तावास महामंडळाने मंजुरी दिली व पूर्ण रक्कम २९/७/२००० रोजी भरण्यात आली.

७) महामंडळाने असे ठरविले की, सदर मशीनरी १९९२ सालातील असल्याने जुनी झाली होती व अद्यावत मशीनरी स्वस्त दरात उपलब्ध झाल्याने जुनी मशीनरी विकत घेणारा खरेदीदार पुढे येणे कठिण होते. तसेच मशीनरीचे भाग वेगवेगळे करणे जिकिरीचे होते. त्यामुळे महामंडळाने जुन २००२ मध्ये मशीनरी मे. कृष्णा चॅरिटेबल ट्रस्ट यांना रु.१५ लाख या किंमतीला विकण्याचा निर्णय घेतला व विक्रीची कार्यवाही पूर्ण केली. सदर मशीनरीच्या विक्रीसंबंधी जो प्रस्ताव सक्षम अधिकारी (Competent Authority) यांच्यासमोर दि.२९/२/२००० च्या सभेत ठेवला होता व ज्यावर विक्रीसंबंधी अंतिम निर्णय घेण्यात आला त्यातील मुख्य मुद्दे पुढीलप्रमाणे होते.

अ) जर महामंडळाने Whole Body CT Scanner या Sophisticataed मशीनरीचा ताबा घेतला असता तर त्याचे भाग वेगवेगळे करण्यासाठी व मशींनरी हलविण्यासाठी एखाद्या त्यातील तज्ञ असलेल्या नामांकित कंपनीला सांगावे लागले असते व त्यासाठी आलेल्या निविदेनुसार रु.२ लाखांहुन जास्त खर्च करावा लागला असता. तसेच मशीनरीचे भाग सुटे करुन मशीनरी हॉस्पिटलमधुन हलविल्यानंतर मशीनरीचे मूल्य घसरले असते.

ब) मशीनरी ताब्यात घेण्यातील अडचणी विचारात घेऊन व इच्छुक खरेदीदार पुढे यावा या हेतुने महामंडळाने सप्टेंबर १९९८ मध्ये दैनिक Indian Express व Chemical Weekly या प्रकाशनात जाहिरात छापली. त्याला काही ग्राहकांकडुन सुरवातीला प्रतिसाद मिळाला परंतु प्रत्यक्ष निविदा प्राप्त झाल्या नाहीत. मशीनरीचा ताबा घेणे, भाग सुटे करणे व हॉस्पिटलमधुन मशीनरी हलविणे यातील विविध अडचणी विचारात घेऊन नंतर जाहिराती देण्यात आल्या नाहीत.

क) महामंडळाने संचालक/हमीदार यांच्या विरुध्द कलम ३१ (१) (aa) खाली जिल्हा न्यायालय, सातारा येथे दिनांक २६/७/१९९६ रोजी दावा दाखल केला आहे. श्री. व सौ. मिरचंदानी या वैयक्तिक हमी दिलेल्या संचालकांचा थागपत्ता न लागल्याने कलम ३१ (१) (aa) खाली महामंडळाने दाखल केलेल्या दाव्यावर Ex-Party सुनावणी होऊ शकली असती. श्री. व सौ. मिरचंदानी पळुन गेल आहेत असे कळल्याने कायदेशीर कारवाईने कर्जवसुलीची शक्यता धुसर आहे.

ड) दि.३/११/१९९९ च्या मुल्यांकन अहवालानुसार सदर इलेक्ट्रो मेडिकल इक्विपमेंटसचे मूल्य रु.२३.२५ लाख एवढे होते व Distress Value रु.२१.९० लाख एवढी होती.

इ) सक्षम अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार कोल्हापूर विभागीय कार्यालयात दिनांक २३/३/२००० रोजी रु.१५ लाखांपेक्षा जास्त रक्कम येण्यासाठी खरेदीदाराशी बोलणी करण्यात आली. सदर चर्चेदरम्यान ट्रस्टचे कायदेविषयक सल्लागार असलेले वकिल, ट्रस्टच्या वतीने कोर्टात उभे राहणारे वकिल, ट्रस्टचे मेडिकल Director व ट्रस्टचे अकाऊंटंट हजर होते. ट्रस्टने आपला रु.१५ लाखांचा प्रस्ताव वाढविण्यास नकार दिला कारण त्यांना रु.१५ लाखांबरोबरच रु.२.३० लाखांचा विक्रीकर भरणे आवश्यक होते.

८) कंपनीच्या संचालकांचा थांगपत्ता लागत नसल्यामुळे व कंपनीने भाग भांडवल न उभारल्याने महामंडळाकडे कोणतेही तारण नसल्याने उर्वरित थकबाकीची रु.१.७४ कोटीची रक्कम वसुल व्हायची शक्यता नाही. अशाप्रकारे कर्ज वितरणासंबंधी घालुन दिलेल्या प्रक्रियेचे पालन न झाल्याने तसेच कर्जदाराने सप्लायरला अग्रीम रक्कम देणे व कंपनीने भागभांडवल उभारणे या वितरणपूर्व अटींचे पालन न झाल्याने व वितरणानंतर पाहणी न झाल्याने रु.१.७४ कोटी एवढा तोटा झाला. कंपनीने कर्जमंजुरीच्या पत्रातील अटीनुसार भागभांडवल उभारले होते व त्याची नोंद दि.२९/७/१९९२ च्या सी.ए. सर्टिफिकेटमध्ये करण्यासाठी आली होती. यावरुन असे सिध्द होते की, महामंडळाने कंपनीद्वारा भांडवल उभारण्याच्या अटीचे पालन करण्याचा पाठपुरावा केला होता. मात्र

कंपनीने वितरणाच्या पहिल्या हप्त्याच्या वेळी सदर अटीचे पालन केले नव्हते व सात दिवसानंतर झालेल्या दुसऱ्या हप्त्याच्या वितरणाच्या वेळी सदर अटीचे पालन केले. आम्ही Proforma Invoice च्या आधारे करावयाच्या कर्जवितरणासंबंधीची मार्गदर्शक तत्वे व कंपनीला वितरित केलेल्या कर्जाच्या प्रक्रियेसंबंधी माहिती दिली आहे. येथे असे सांगावेसे वाटते की, कंपनीने महामंडळाला असे कळविले होते की, Proforma Invoice प्रमाणे मशीनरी डिलीव्हरीसाठी तयार आहेत तसेच दि.२९.७.१९९२ च्या सी.ए.सर्टिफिकेटमध्ये असे प्रमाणीत करण्यात आले होते कि Proforma Invoice/Bill प्रमाणे मशीनरी खरेदी केल्या असुन जागेवर स्थापित करण्यात आल्या आहेत.

२.३ महामंडळाच्या वरील अभिप्रायाशी शासनाने सहमती दर्शविली आहे.

२.४ या प्रकरणी समितीने महामंडळाच्या व शासनाच्या प्रतिनिधींची दिनांक ४ ऑक्टोबर २००६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी, व्यवस्थापकीय संचालकांनी समितीच्या प्रश्नाच्या संदर्भात माहिती दिली की, सध्या ही कंपनी अस्तित्वात नाही. ही कंपनी श्री. व सौ. मिरचंदानी यांची होती. मे. कृष्णा मेडीकेअर प्रा. लि. ने कृष्णा हॉस्पिटल ॲन्ड मेडिकल सेंटर, कराड येथे बसविण्यासाठी इलेक्ट्रोमेडिकल इक्वीपमेंट खरेदी करण्यासाठी रु.९० लाखांचे कर्ज महावित्तकडून देण्यात आले होते. या बाबतीत महालेखापरीक्षकांचा आक्षेप आहे की, कंपनीने रु.४९ लाख भरणा केलेले भागभांडवल उभारले पाहिजे आणि ते महामंडळाकडे कर्जवितरणापूर्वी सुरक्षा म्हणून ठेवले पाहिजे होते. परंतू ही अट पूर्ण न करता कर्ज देण्यात आले आहे आणि कर्ज वितरणाच्या तारखेपासून १२ दिवसानंतर त्यांनी शेअर्स उभारलेले आहेत. या प्रकरणी सर्व नियमांचे उल्लंघन करुन कर्ज वितरीत केल्यामुळे रु.१.७४ कोटीचा तोटा झाला आहे. या बाबत महामंडळाने पुढे कोणती कारवाई केली या प्रश्नास उत्तर देण्यात आले की, रु.२५ लाख व भरणा झालेले भाग-भांडवल रु.१० लाख होते. कंपनीने आपले भागभांडवल रु.४९ लाख एवढे वाढविण्याचे व तसे सर्टिफिकेट सादर करण्याचे आश्वासन दिले होते. ते सादर करण्यास १५ दिवसांचा कालावधी कंपनीला दिला होता. कर्ज वितरणासाठी एवढी घाई करण्याचे कारण सांगताना एम.डी.नी सांगितले

की, महामंडळाद्वारे मे. विप्रो जीई मेडिकल सिस्टम लि.यांच्या प्रोफार्मा इनव्हाईसच्या आधारे मशिन सप्लायरला अग्रिम रक्कम दिल्यासंबंधी सी.ए. च्या सर्टिफिकेटच्या आधारे रु.५१ लाखाचे कर्ज वितरीत केले आहे. त्यानंतर ९० लाख रु. किंमतीच्या मशिनरीचा पुरवठा परस्पर केलेला असेल असे गृहित धरले होते. दोन-तीन वर्षे कर्जाची वसूली होत होती. वसूली थांबल्यानंतर कंपनीची तपासणी करण्यात आली. तेंव्हा कर्जदार पळून गेलेले आहेत असे समजले. त्यांच्याविरुध्द पासपोर्ट ऑफिसला कळविले आहे की, त्यांच्या पासपोर्टची नुतनीकरण करण्यात येऊ नये. तसेच त्यांच्याविरुध्द एक-दोन दिवसांत पोलीसात केस दाखल करण्यात येणार आहे. या प्रकरणी मार्गदर्शक तत्वांचे पालन न करता रु.१.३० कोटींचे कर्ज वितरीत करण्यात आले आहे. नियमांचे उल्लंघन करुन हा घोटाळा करण्यात आला आहे. म्हणून दोन्ही बाजूंच्या दोषी अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल झाला पाहिजे. या प्रश्नाला उत्तर देण्यात आले की, यामध्ये जे महामंडळाचे अधिकारी दोषी होते त्यांची माहिती घेण्यात येईल व त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

२.५ **<u>अभिप्राय व शिफारशी :-</u>**

समितीला या प्रकरणी मिळालेली लेखी माहिती व साक्षीच्या वेळी मिळालेली तोंडी माहिती विचारात घेता असे दिसून आले की, राज्य वित्तीय महामंडळाने किरण मेडिकेअर खाजगी मर्यादित यांना इलेक्ट्रो वैद्यकीय उपकरणे संस्थापित करण्यासाठी रुपये ९० लाखाची दोन कर्जे सप्टेंबर - नोव्हेंबर १९९१ मध्ये मंजूर केली होती. या कंपनीकडून महामंडळाला नोव्हेंबर १९९९ पर्यंत रु.१.८९ कोटींचे येणे प्रलंबित होते. कर्ज संवितरीत करण्यापूर्वी कंपनीने रु.४९ लाखांचे भाग भांडवल उभारुन ते महामंडळाकडे सुरक्षा ठेव म्हणून तारण ठेवावयाचे होते. ही अट पूर्ण न होताच कर्जाचे संवितरण करण्यात आले होते. महामंडळाने पुरवठाकारांना प्रोफार्मा बिजकाच्या आधारावर रु.८५ लाखांचे प्रदान जून १९९२ मध्ये केले होते. दोन यंत्रासाठी अग्रीम दिले असतांना कंपनीला फक्त एकच यंत्र पुरविले होते. पुरवठाकाराकडे विचारणा केली असता कळले की, कंपनीने फक्त एकाच मशीनरीसाठी मागणी नोंदविली होती. परिणामी पुरवठादाराविरुध्द कारवाई करणे शक्य नव्हते

कारण प्रकरण टाईमबार झाले होते. प्रोफार्मा बिजकाच्या आधारावर अग्रीमाची तपासणी न करताच पैशांचे वितरण करणे हे नियमांचे उल्लंघन करणारे होते. वैद्यकीय उपकरणे १५ दिवसात पुरवठा करण्याचे ठरले असताना ही अट न पाळल्याने त्वरीत अग्रीम परत करण्याची आवश्यकता होती. अन्यथा फौजदारी कारवाई करण्याची आवश्यकता होती. परंतु महामंडळाने फौजदारी कारवाई केली नाही. कर्ज वितरणानंतर तपासणी सप्टेंबर १९९८ मध्ये म्हणजे सहा वर्षानंतर करण्यात आली. या अनियमितांच्या परिणामी रु.१.७४ कोटी सप्टेंबर २००३ पर्यंत वसूल झाले नव्हते.

कंपनीने जरी भाग भांडवल उभारले नव्हते तरी महामंडळाने कंपनीकडून हमीपत्र घेतले होते की, सदर अटीची पूर्तता १५ दिवसात करण्यात येईल. कंपनीच्या संचालकांचा थांगपत्ता लागत नसल्याने व कंपनीने भाग भांडवल न उभारल्याने महामंडळाकडे कोणतेही तारण नसल्याने थकबाकीची रु.१.७४ कोटीची रक्कम वसूलीची शक्यता नाही. अशाप्रकारे कर्ज वितरणासंबंधी घालून दिलेल्या प्रक्रियेचे पालन न झाल्याने व कर्ज वितरणानंतर पाहणी न झाल्याने रु.१.७४ कोटींचा तोटा झाला.

महालेखापरिक्षकांनी या आक्षेपासंबंधात जे मत नोंदविले आहे ते महामंडळाने सविस्तरपणे जसेच्या तसे कबूल केले आहे. कर्ज वितरीत करण्यापूर्वी ज्या प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक होते, कर्ज वसूलीसाठी ज्या बाबींची पूर्तता करुन घेणे जरुरीचे होते, कर्ज वितरीत केल्यानंतर त्वरीत जी पाहणी करुन खात्री करुन घेणे आवश्यक होते त्यापैकी एकही गोष्ट महामंडळाने निटपणे पार पाडली नाही. उद्योगांना कर्ज मंजूर करुन वितरीत करण्याचे य वित्तीय महामंडळाचे काम आहे. त्यासाठी नियमावली व मार्गदर्शक तत्वेही ठरविण्यात आली आहेत. या सर्व नियमांना अनुसरुन व नियमांच्या अधिन राहूनच महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी कर्ज मंजूर व वितरीत करण्याचे काम करणे आवश्यक होते. परंतु तसे या प्रकरणी काहीही झाले नाही. तारण न घेता कर्ज वितरीत करण्यात आले व त्यानंतर सहा वर्षानी तपासणी करण्यात आली जी १५ दिवसात करावयास हवी होती. कर्ज वितरणानंतर १५ दिवसात मशीनरीचा पुरवठा करावयाचा होता पण तसे झालेले नाही. परिणामी अग्रीमाची

रक्कम लगेच परत घेणे आवश्यक असताना तसेही करण्यात आले नाही व पुरवठाकाराविरुध्द फौजदारी कारवाईसुध्दा केलेली नाही. या सर्व परिस्थितीचा विचार करता महामंडळाच्या अधिकाऱ्यांचे कंपनीशी संगनमत होते असाच निष्कर्ष निघतो. त्यामुळेच ही परिस्थिती निर्माण झाली असे समितीचे स्पष्ट मत आहे. या प्रकरणी महामंडळाने केलेली अनियमितता, दाखविलेला निष्काळजीपणा यामुळे हा रु.१.७४ कोटींचा तोटा महामंडळाला झाला आहे. त्याची संपूर्णपणे भरपाई झाली पाहिजे असे समितीचे मत आहे. **म्हणून या प्रकरणी दोषी असणाऱ्या महामंडळाच्या सर्व अधिकाऱ्यांकडून भले ते सेवानिवृत्त झालेले असले तरी आणि प्रसंगी वसूलीसाठी त्यांच्या संपत्तीचा लिलाव करावा लागला तरी ती सर्व रक्कम वसूल करण्यात यावी अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे. या प्रकराशी संबंधित असलेले श्री. मिरचंदानी व सनदी लेखा परिक्षक यांच्याविरुध्द देखिल फौजदारी गुन्हा दाखल करावा व त्याचा कसोशीने पाठपुरावा करावा अशीही समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

**तीन : अवर्धनक्षम प्रकल्पाला कर्जाचे संवितरण -**

३.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००२-२००३ च्या (वाणिज्यिक) अहवालातील परिच्छेद क्रमांक ४.१९ मध्ये **"अवर्धनक्षम प्रकल्पाला कर्जाचे संवितरण"** यांसंबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की, तांत्रिकदृष्ट्या अवर्धनक्षम प्रकल्पाला कर्ज देण्यात आले व संवितरित केलेल्या रकमेपैकी कांही भागाबाबत तडजोड केल्यामुळे रुपये १.७४ कोटीचे नुकसान झाले होते.

वस्त्रोद्योग व खांडसरी उद्योगात वापरले जाणारे सोडीयम हायड्रो सल्फेट (रसायन) उत्पादन करणारे संयंत्र संस्थापित करण्यासाठी महामंडळाने सरनोबत केमिकल्स (एकक) यांना रुपये ९० लाखाचे मुदत कर्ज मंजूर केले होते (जुलै १९९४). महामंडळाने एककाला रुपये ८८ लाख कर्जाचे वाटप केले होते. (फेब्रुवारी/मार्च १९९५). एककाने उत्पादन १९९५ मध्ये सुरुवात व एक महिन्यांच्या आतच एप्रिल १९९५ मध्ये उत्पादन बंद केले होते. ऑगस्ट २००० अखेर प्रलंबित असलेले येणे रुपये २.३५ कोटी (मुद्दल : रुपये ८८ लाख :व्याज रुपये १.४७ कोटी) होते.

वरील कर्जाच्या व्यवहाराची छाननी केली असता खालील बाबी निदर्शनास आल्या :-

* वरील केमिकल्सचे उत्पादन करणारे बहुतेक एकक एकतर मोठे व मध्यम आकाराचे उद्योग होते किंवा छोटे उद्योग त्यांत यशस्वी झाले नव्हते ही गोष्ट महामंडळाला कर्ज संवितरित करतेवेळी स्पष्टपणे माहिती होती. छोट्या उद्योग क्षेत्रात या उद्योगाची वर्धनक्षमता आहे की नाही याबाबत गंभीर शंका असतांना महामंडळाने नियोजित उत्पादनाचे यशस्वी उत्पादन रेटेड क्षमतेनुसार सुरु झाल्यानंतर दोन महिन्यांनी कर्ज संवितरित करण्याबाबतची योग्य अट विहित केली होती. परंतु ही अत्यंत महत्त्वाची अट परिपूर्ण झालेली नसतांना ही कर्जाचे संवितरण करण्यात आले होते. एककाने उत्पादन कार्यान्वयन झाल्यानंतर एकाच महिन्याच्या आत म्हणजे एप्रिल १९९५ मध्ये उत्पादन बंद केले होते.
* एकक कर्ज परतफेडीत कर्ज घेतल्यापासून सहा महिन्यांच्या आतच कसूरदार झालेला असतांना महामंडळाने कारवाई करण्यात चार वर्षाचा (नोव्हेंबर १९९९)

विलंब केला होता त्यावेळी एककाने दिलेली कोलॅटरल सुरक्षा जी रुपये १.२२ कोटी होती त्यांची किंमत रुपये ६१.३८ लाख एवढी कमी झाली होती.

* एक वेळची तडजोड (ओटीएस) बाबत स्वत:च्याच मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन करुन महामंडळाने एककाचा रुपये ६१.३८ लाखाचा देकार जो प्रलंबित असलेल्या मुद्दलापेक्षा रुपये २६.६२ लाखाने (जुलै २००१) कमी होता तरीही त्यांचा ओटीएस योजनेअंतर्गत स्वीकार केला होता.

महामंडळाने वरील तथ्याचा स्वीकार करतांना म्हटले होते की, (फेब्रुवारी २००३) वसुली कारवाई वेळखाऊ असल्यामुळे प्रवर्तकांनी या प्रकल्पामध्ये वरील मोठी रक्कम गमावलेली होती हे विचारात घेऊन ओटीएस स्वीकारण्यात आले होते. महामंडळाने अवर्धनक्षम प्रकल्पाला वित्तीय पुरवठा केला व प्रवर्तकांने पैसा गमावला होता या आधारावर पूर्ण रकमेची वसुली केली नाही हे स्वीकारार्ह्य नव्हते.

ही बाब शासनाला कळविली (मे २००३) होती, उत्तर मिळाले नव्हते. (नोव्हेंबर २००३).

३.२ या प्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमुद केले की, सदर कंपनीला दिलेल्या कर्जाचा प्रस्ताव मंजुरीसाठी संचालक मंडळाच्या २१.७.१९९४ च्या बैठकीसमोर ठेवण्यात आला. संचालक मंडळाने मे.सरनोबत केमिकल्स प्रा.लि. या कंपनीस रु.९० लाखांचे कर्ज मंजुर केले आणि असा आदेश दिला की, कर्जमंजुरीचा सदर निर्णय कंपनीस कळविण्याच्या आधी महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी मे. Alliance Processors Pvt.Ltd., Surat या कंपनीस भेट देऊन ती चांगल्या प्रकारे कार्यान्वीत असल्याबद्दल खात्री करुन घ्यावी. तसेच एखाद्या नामांकित तज्ञाकडुन (Technical Consultant) सदर प्रकल्पाचे स्वरुप बघता तो तांत्रिकदृष्ट्या सक्षम व आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरेल यासंबंधी दुसरे मत घ्यावे. महामंडळाच्या अधिकाऱ्यांद्वारे प्रकल्प फायदेशीर ठरेल अशी खात्री होण्याबरोबर प्रस्तावाच्या Covering Note मधील पुढील अट रद्द करण्यात यावी असा आदेश संचालक मंडळाने दिला. "सदर कर्जाचे वितरण महामंडळाने पुढील बाबींची पुर्तता झाल्यानंतर करावे.

अ) प्रस्तावित उत्पादनाचे नमुना उत्पादन (Trial Production) दर्जेदार असुन Roted Capacity प्रमाणे असावे आणि

ब) अर्जदार कंपनीकडुन अंडरटेकिंग घेण्यात यावे कि ते उत्पादनाचा दर्जा, तसेच Input Output Norms, Yield Factors इ. बद्दल समाधानी आहेत.

मंजुरीपत्र पाठविण्याच्या आधी श्री. सरनोबत यांना संचालक मंडळाच्या वरील निरिक्षणाच्या संदर्भात चर्चेसाठी बोलविण्यात आले. श्री. सरनोबत यांनी स्वत: असे लेखी निवेदन दिले की, महामंडळाने प्लँट कार्यान्वीत झाल्यानंतर आणि महामंडळाने व प्रवर्तकांनी उत्पादनाचा दर्जा व उत्पादन क्षमतेच्या प्रमाणात उत्पादन (Yield in Relation to Rated capacity) याबद्दल खातरजमा करुन नंतरच कर्ज वितरण करावे. त्यानुसार मंजुरीपत्रात सदर अटीचा अंतर्भाव करण्यात आला. सदर वितरणपूर्व अटीसंबंधी असे ठरले की, सदर अट समावेशक ((More Onerous) असुन मंजुरी पत्र पाठविण्यात यावे व तसे संचालक मंडळास कळविण्यात यावे. नंतर संचालक मंडळाच्या २.३.१९९५ रोजी झालेल्या बैठकीत त्याबद्दल माहिती ठेवण्यात आली व संचालक मंडळाने त्यांची नोंद घेतली.

यासंदर्भात महामंडळ असेही कळवु इच्छिते की, कर्जवितरणाला मंजुरी देताना विभागीय कार्यालयाकडुन पुढील माहिती प्राप्त झाली.

१) महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी सदर कारखान्यास ४/२/१९९५ रोजी भेट दिली असता, असे दिसुन आले की प्रकल्पाची उभारणी पूर्ण झाली असुन व्यापारी स्तरावर उत्पादन (Commercial Production) जानेवारी १९९५ पासुन सुरु झाले आहे.

२) Rated Capacity ३ शिफ्टस विचारात घेऊन २ मे. टन प्रति दिन उत्पादन होत होते.

३) कंपनीने ३ शिफ्टसमध्ये उत्पादनास १५/१/१९९५ पासुन सुरुवात केली आणि उत्पादन क्षमतेच्या ८५ % ते ८८% उत्पादन करण्यात येत होते.

४) प्रवर्तकांनी Yield बद्दल प्रमाण ठरविले असुन (Standardised) गुळ उत्पादकांच्या मते उत्पादनाचा दर्जा समाधानकारक होता.

५) तसेच महामंडळाकडे कंपनीच्या ३०/१२/१९९४ ते ३/२/१९९५ पर्यंतच्या बँच रेकॉर्डसच्या छायांकित प्रती आहेत. अहवालावरुन एकुण उत्पादन, उत्पादनाची शुध्दता (Purity) Yield इ. संबंधी माहिती मिळते. कर्ज वितरणाचा पहिला हप्ता २०/२/९५ रोजी देण्यात आला (उत्पादन समाधानकारक सुरु झाल्यानंतर दीड महिन्यानंतर परंतु दोन महिन्यापेक्षा थोड्या कमी कालावधीत) या सर्व घटनांची माहिती संचालक मंडळाच्या २/३/१९९५ च्या बैठकीत देण्यात आली. त्यावेळी सुध्दा कंपनी कार्यान्वीत होती.

निरिक्षण अहवालातील (अ) या अटीच्या उल्लंघनाबद्दलच्या अभिप्रायासंदर्भात वरील माहिती विचारात घेतली पाहिजे. सदर कंपनीचे उत्पादन सप्टेंबर १९९५ पासुन बंद झाले, त्यामागे उत्पादन प्रक्रियेतील अडचणी आणि कुशल व अनुभवी कामगारांची कमतरता ही मुख्य कारणे होती. सदर कंपनी कसुरदार झाली व मुद्दल किंवा व्याजाच्या बाबतीत कोणतीही परतफेड कंपनीने केली नाही.

अहवालातील वरील विधानासंबंधी महामंडळ पुढे असे कळवु इच्छिते :-

संबंधित विधान (item No.२० High Power Committee Dated ९/५/२००१) च्या कागदपत्रांच्या आधारे करण्यात आले आहे. याबाबतीत असे नमुद करावेसे वाटते की मे. सरनोबत केमिकल्सच्या एकरकमी कर्जपरतफेड प्रस्ताव उच्च स्तरीय समितीसमोर दिनांक ९/५/२००१ च्या बैठकीत ठेवण्यात आला होता. (Agenda Item No.१०) या संदर्भात असा खुलासा करण्यात येतो की, कंपनीने सुरुवातीपासुन ३१/८/२००० पर्यंत ९.०३ लाख रुपयांचा भरणा केला असून त्यात व्याजापोटी रु.७.८६ लाख व खर्चापोटी रु.१.१७ लाखांचा समावेश होता.

उच्चस्तरीय समितीसमोर दि.९/५/२००१ च्या बैठकीत ठेवलेल्या प्रस्तावात "Changes in Circumstances Having Bearing on or Reasons for the Actual Performance Being Below Estimates or Reasons for Failure" या मुद्याखाली दिलेला तपशील खाली दिल्याप्रमाणे उद्धृत करत आहोत.

"आवश्यक त्या दर्जाचे उत्पादन करण्यासंदर्भात नमुना उत्पादन (Trial Production) सुरु करुन त्यास बाजारपेठेत मान्यता मिळाल्यानंतर कंपनीने मार्च

१९९५ मध्ये नियमित उत्पानास आरंभ केला. परंतु आयातविषयक धोरणात केंद्रशासनाने १९९५ साली सुधारणा केल्यामुळे अधिक चांगल्या दर्जाचे परदेशी उत्पादन विशेषत: चीन देशातील उत्पादन स्वस्त दरात व मुबलक झाले. त्याच्या परिणामस्वरुप कंपनीचा कारखाना सुरु झाल्यापासुन ५ ते ६ महिन्याच्या आतच उत्पादन बंद झाले. त्याचप्रमाणे कंपनीने उपलब्ध असलेल्या यंत्रसामुग्रीचा वापर करुन इतर प्रकारच्या उत्पादनांच्या निर्मितीचा प्रयत्न केला परंतु तोसुध्दा अयशस्वी ठरला. त्यामुळे कंपनीचा व्यवहार सप्टेंबर १९९५ पासुन आजपर्यंत बंद पडला आहे. या व्यतिरिक्त कंपनीस कुशल कामगारांच्या कमतरते बरोबरच उत्पादन प्रक्रियेत व प्लँटमध्ये तांत्रिक अडचणींशी सामना करावा लागला. या कारणांमुळे कंपनीला आवश्यक त्या उत्पादनांची हव्या असलेल्या प्रमाणात निर्मिती करणे शक्य झाले नाही व एकुण प्रकल्प अपयशी ठरले."

वरील खुलाश्यावरुन असे दिसुन येईल की, प्रकल्पासमोरील अडचणी मुख्यत्वेकरुन १९९५ साली केंद्र शासनाने आयात विषयक धोरणात केलेल्या बदलामुळे उत्पन्न झाल्या, कारण सदर बदलामुळे अधिक चांगल्या दर्जाचे परदेशी उत्पादन स्वस्त दराने व मुबलक प्रमाणात (विशेषत:चीन देशात निर्मित) उपलब्ध झाले होते. परंतु कंपनीसमोर कुशल व अनुभवी कामगारांची कमतरता, उत्पादनप्रक्रियेतील नंतर आलेल्या अडचणी इ. प्रश्न उभे राहिले होते. मात्र सदर प्रश्न सोडविणे कालांतराने शक्य झाले असते. तसेच असे दिसुन येते की, विशेषत: हे प्रश्न कंपनीने इतर प्रकारच्या उत्पादनांची निर्मिती करण्यास सुरुवात केल्यानंतर उद्‌भवले होते, परंतु स्वस्त दरात आयात होणारी उत्पादने ही कंपनीसमोरील मुख्य अडचण ठरली की ज्यामुळे इतर प्रकारच्या उत्पादनांची निर्मिती करण्याचा प्रयत्न करुनदेखिल यश न झाल्याने कंपनीला आपले व्यवहार बंद करावे लागले.

वरील संदर्भात आम्ही पुढीलप्रमाणे कळवु इच्छिते :-

कर्जमंजुरीच्या प्रस्तावानुसार (Appraisal Memorandum) प्रवर्तकांनी एकुण ४५ लाख रुपयांची गुंतवणूक प्रकल्पात कर्जमंजुरीपूर्वी केली होती की, ज्यावरुन स्पष्ट होते की, प्रवर्तकांना प्रकल्प यशस्वी होईल याची खात्री होती. प्रवर्तकांकडुन अशीही

सूचना करण्यात आली होती की, त्यांना प्रकल्प यशस्वी होईल याची खात्री असल्याने उत्पादनास आरंभ झाल्यानंतर दोन महिन्यानंतर कर्जवितरण होण्यास त्यांची मान्यता होती. सदर सुचना महामंडळाने मान्य केली होती व त्यानुसार कर्जमंजुरीपत्रातील अटीत आवश्यक तो बदल करण्यात आला होता. मात्र अशी वस्तुस्थिती आहे की, प्रकल्प दोन महिन्यापेक्षा जास्त काळ यशस्वीरित्या चालु शकला नाही.

यासंदर्भात महामंडळ पुढीलप्रमाणे कळवु इच्छितो :-

कंपनीने दिलेल्या एकरकमी कर्ज परतफेड प्रस्तावात प्रवर्तकांच्या कुटुंबियांच्या मालकीच्या मालमत्तेसंबंधी अहवाल जोडला आहे की ज्यात दिलेले सदर मालमत्तांचे मुल्य महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या मुल्यांकनाच्या अनुमानाएवढे होते. यावरुन असे गृहित धरण्यात आले की, सरनोबत कुटुंबीय वित्तीयदृष्ट्या सक्षम असुन महावित्तच्या कर्जाच्या दायित्वाखेरिज (Liability) त्यांच्यासमोर इतर कोणतीही दायित्वे नाहीत. याबाबतीत असे दिसुन येते की प्रवर्तकांनी दि.२२/५/२००१ रोजी केलेली कर्जपरतफेडीबद्दल विनंती महामंडळाच्या संचालक मंडळासमोर २/७/२००१ च्या बैठकीत ठेवण्यात आली. सदर विनंतीनुसार महामंडळाने रु.६१.३८ लाख रुपयांचा OTS प्रस्ताव स्वीकारावा असे कळविले होते. या प्रस्तावाबरोबर प्रवर्तकांच्या मालकीच्या मालमत्तांसंबंधी जी सविस्तर माहिती दिली होती ती विभागीय कार्यालयाकडे दिलेल्या एकरकमी कर्जपरतफेडीच्या प्रस्तावातील माहितीशी बहुतांशी समान होती. फक्त काही मालमत्तांच्या मुल्यांच्या बाबतीत फरक दिसुन आला. कंपनीने दिनांक २२/५/२००१ च्या पत्रात सदर मालमत्तांवर कोणताही बोजा (Encumbered) आहे किंवा नाही याबद्दल सविस्तर माहिती दिली होती. (सदर माहिती विभागीय कार्यालयाकडे दिलेल्या एकरकमी कर्जपरतफेड प्रस्तावाबरोबर देण्यात आली नव्हती).

अशाप्रकारे सरनोबत कुटुंबियांच्या मालकीच्या मालमत्तांसंबंधीच्या प्रस्तावात दिलेल्या माहितीवरुन व Enquiry Report मधील माहितीवरुन असे दिसुन येते की, सरनोबत कुटुंबियाच्या मालकीच्य काही मालमत्तांवर बोजा (Encumbered) होता. ही माहिती जर विभागीय कार्यालयाकडे पूर्वी उपलब्ध झाली असती तर सरनोबत कुटुंबियांची वित्तीय स्थिती समाधानकारक असुन त्यांना महावित्तखेरिज इतर दायित्वे

नसल्यासंबंधीचे विधान करण्यात आले नसते. महामंडळाकडे तारण मालमत्तेच्या आधारे थकबाकी वसुल करण्यासाठी कारवाई करण्याचा पर्याय उपलब्ध होता. परंतु महामंडळाचा मालमत्ता ताब्यात घेऊन विक्री करण्याचा अनुभव समाधानकारक नाही. याबाबतीत OTS Proposal मध्ये पुढील विधान करण्यात आले आहे.

"महामंडळाने पूर्वी ताब्यात घेतलेली सदर मालमत्ता विकण्यासाठी जाहिरातीद्वारे व खाजगी निविदा मिळण्यासाठी प्रयत्न केले होते. परंतु सदर प्लँट व मशीनरी Special Purpose Machinery असल्याने व त्याचा उपयोग फक्त रासायनीक उद्योगात शक्य असल्याने सदर प्रयत्नांना यश आले नाही. असे दिसुन आले की महामंडळाने सदर मालमत्ता विकण्याचे ठरविल्यास फक्त Distress Value एवढयाच किंमतीला ती विकावी लागेल.

तसेच कलम ३२ (जी) खाली कर्जवसुलीसाठी केलेल्या कायदेशीर कारवाईचा लाभ मिळाला नाही कारण सदर प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे. या सर्व बाबी संचालक मंडळासमोर OTS प्रस्तावावर निर्णय घेताना ठेवण्यात आल्या होत्या.

३.३ महामंडळाच्या वरील अभिप्रायाशी शासनाने सहमती दर्शविली आहे.

३.४ वित्तीय महामंडळ व शासनाकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीवर समितीने दिनांक ४ ऑक्टोबर २००६ रोजी महामंडळाच्या व शासनाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांनी या प्रकरणाबाबत माहिती दिली की, केमीकल तयार करण्यासंबंधीचा हा प्रकल्प होता व या उत्पादनाचा उपयोग साखर कारखान्यासाठी होत होता. त्यादृष्टीनेच हा प्रकल्प सुरु करण्यात आला होता. या प्रकरणाच्या कर्जवाटपाबाबत अट घालण्यात आली होती की, प्रत्यक्षात व्यापारी उत्पादन सुरु झाल्यानंतर दोन महिन्यांनी कर्ज वितरण करण्यात यावे. याप्रकरणी व्यापारी उत्पादन सुरु करण्याची प्रक्रिया दिनांक ५ जानेवारी १९९५ रोजी सुरु झाली व त्यानंतर १ महिना २० दिवसांनी कर्ज वाटप झाले आहे. चांगल्या रितीने गुणवत्तापूर्ण विक्री झाल्यानंतरच कर्जाचे वाटप करण्यात आले होते. सदर प्लँटला महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी दिनांक ४/२/१९९१ रोजी भेट दिली. त्यावेळी ३१ जानेवारी, १९९५ पासून उत्पादन सुरु झाल्याचे आढळून आले त्यामुळे २० फेब्रुवारी १९९५ रोजी

कर्जवाटप करण्यात आले होते. व्यवस्थापकीय संचालकांच्या परवानगीने व संचालक मंडळासमोर हा विषय ठेऊनच ती शिथील करुन कर्ज वाटप करण्यात आले आहे. यासंदर्भात कर्ज वितरणाला मंजूरी देताना विभागीय कार्यालयाकडून जी माहिती प्राप्त झाली होती ती चुकीचे असल्याचे निदर्शनास येते या समितीच्या प्रश्नास उत्तर देताना व्यवस्थापकीय संचालकांनी सांगितले की, विभागीय कार्यालयाच्या अहवालात आलेली माहिती खरी होती. उत्पादन क्षमतेच्या ८५ ते ८८ टक्के उत्पादन कंपनी करीत होती व कंपनीकडे मालाची मागणी व विक्रीही चालू होती. परंतु नंतर बाजारात दर खाली आल्याची माहिती मिळाली. या प्रकरणी विभागीय कार्यालयातून चुकीची माहिती दिली गेली असल्यास चौकशी करुन त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात येईल.

३.५ **अभिप्राय व शिफारशी :-**

या प्रकरणी समितीला मिळालेली लेखी माहिती व साक्षीच्या वेळी मिळालेली माहिती यावरुन असे दिसून येते की, तांत्रिकदृष्ट्या अवर्धनक्षम प्रकल्पाला कर्ज देण्यात आले व संवितरीत केलेल्या रकमेपैकी काही भागाबाबत तडजोड केल्यामुळे रु.१.७४ कोटींचे नुकसान झाले होते. महामंडळाने सरनोबत केमीकल्स या उद्योगाच्या वर्धनक्षमतेची योग्य प्रकारे छाननी केली नाही. नियोजित उत्पादकाचे उत्पादन रेटेड क्षमतेनुसार व्यापारी दृष्टीकोनातून सुरु झाल्यानंतर दोन महिन्यांनी कर्ज संवितरीत करण्याची अट होती. परंतु ही अट पूर्ण झाली नसताना १ महिना २० दिवसांनी कर्जाचे संवितरण केले. परंतु काही महिन्यातच कंपनी बंद पडली. कर्ज घेतल्यापासून सहा महिन्यात कंपनी कसूरदार झाली असताना महामंडळाने कारवाईसाठी मात्र चार वर्षाचा विलंब केला. त्यावेळी कोलॅटरलची दिलेली सुरक्षा रुपये १.२२ कोटीवरुन रु.६१.३८ लाख एवढी कमी झाली होती. तरीही स्वतःच्या मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन करुन महामंडळाने कंपनीचा रु. ६१.३२ लाखांचा एकरकमी कर्जफेड देकार मुद्दलापेक्षा २६.६२ लाख रु. ने कमी असताना स्वीकारला. कारण महामंडळाच्या मते वसूलीची कारवाई वेळखाऊ होती व कंपनीने मोठी रक्कम गमावलेली होती. याबाबत कर्ज वितरीत करण्यापूर्वी संचालक मंडळाने काही अटी घातल्या होत्या व त्यांची पूर्तता झाल्यानंतरच कर्ज वितरीत करण्यात यावे असे स्पष्ट केले होते परंतु महामंडळाच्या

अधिकाऱ्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. महामंडळाच्या विभागीय कार्यालयाच्या अधिकाऱ्यांनी कंपनीला दिनांक ४/२/१९९५ रोजी भेट देऊन पाहणी केली व उत्पादन समाधानकारक व दर्जेदार स्वरुपात व्यापारी स्तरावर जानेवारी १९९५ पासून सुरु झाल्याचा अहवाल महामंडळास कळविला होता. परंतु हा अहवाल सर्वथा वस्तुस्थितीशी विसंगत होता यात शंका नाही कारण जानेवारी ९५ मध्ये पूर्ण क्षमतेने उत्पादन करणारी कंपनी सप्टेंबर ९५ मध्ये बंद पडते यावरु खरे काय ते दिसून येते. त्यामुळे चुकीचा अहवाल देणारे अधिकारी/कर्मचारी शिक्षेस पात्र ठरतात. कारण त्यांच्या अहवालावरुनच कर्ज संवितरीत करण्याची प्रक्रिया पार पाडण्यात आली आहे. त्यांनी संगनमताने चूकीचा अहवाल सादर केला हे उघड सत्य आहे. साक्षीच्यावेळीही या मुद्यावर चर्चा होऊन यासंबंधी चौकशी करुन कारवाई करण्यात येईल असे व्यवस्थापकीय संचालकांनी स्पष्ट केले आहे. स**मितीची शिफारस आहे की, यासंबंधात पुन:श्च चौकशी करुन असत्य अहवाल देणाऱ्या तत्कालीन अधिकाऱ्यांविरुध्द कडक कारवाई करण्यात यावी** संचालक मंडळाने देखिल व्यापारी तत्वावर उत्पादन सुरु होते तसेच त्याचा बाजारातील खप याबाबत काटेकोरपणे शहानिशा न करता दोन महिने पूर्ण होण्यापूर्वीच कर्ज वाटप केले. त्याकरीता त्यांनी दोन महिन्याची अट देखिल शिथिल केली. त्यामुळे या गैरव्यवहारास ते देखिल जबाबदार आहेत. त्यांनी आपली जबाबदारी योग्यरित्या पार पाडलेली नाही. **समितीची शिफारस आहे की, त्यांचेकडून देखिल महामंडळाचे झालेले नुकसान भरुन घेण्याचा प्रयत्न महामंडळाने करावा.** सध्या महामंडळाचे कर्ज वितरणाचे काम बंद पडले आहे त्यास अशीच कारणे असावित असे समितीचे स्पष्ट मत आहे. सध्या महामंडळ केवळ कर्ज वसूलीचे काम करीत आहे. आणि ही रक्कम जवळपास १३०० कोटी रुपयांच्या दरम्यान आहे असे साक्षीचे वेळी सांगण्यात आले आहे. महामंडळाच्या अधिकाऱ्यांची अकार्यक्षमताच यास जबाबदार आहे असे म्हटले तर ते वावगे ठरु नये. सर्वच महामंडळाच्या बाबतीत समितीला कमी अधिक प्रमाणात अशीच परिस्थिती दिसून आली. वास्तविक पाहता यामध्ये शासनाचा फार मोठा दोष आहे कारण अशा भ्रष्टाचारी व संगनमताने गैरकारभार करणाऱ्या अधिकाऱ्यांना धाक वाटेल अशी कोणतीही कडक कारवाई महामंडळ तसेच शासनामार्फत करण्यात येत नाही.

शासनाचे अधिकारीही महामंडळाच्या अधिकाऱ्यांच्या गैरव्यवहारांना संरक्षण देत आहेत काय अशी शंका समितीच्या मनात येते. त्यामुळे महामंडळाच्या कारभारावर शासनानेदेखिल जागरुकतेने लक्ष ठेवणे आवश्यक आहे. गैरकारभारात दोषी आढळून आलेल्या अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांचे विरुध्द तातडीने कारवाई केली गेली तरच अशा गैरकारभारांना आळा बसेल. **शासनाने तसेच महामंडळाने याबाबीचा विचार करुन योग्य ती पाऊले उचलावित अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

या संबंधात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांचे आत कळविण्यात यावी.

## चार : पर्याप्त सुरक्षाउपाया शिवाय कर्ज मंजूरी -

४.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००२-२००३ च्या (वाणिज्यिक) अहवालातील परिच्छेद क्रमांक ४.२० मध्ये "**पर्याप्त सुरक्षाउपाया शिवाय कर्ज मंजूरी** " या संबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले की, महामंडळाकडे अपर्याप्त प्रतिभूती असल्यामुळे रुपये ५.१३ कोटी येण्याची वसुली झाली नव्हती.

महामंडळाने मायो इंडिया मर्यादित (एमआयएल) यांना आधीच थकित असलेल्या कर्जाचे रुपये ४० लाख वजा करुन घेऊन रुपये १.१० कोटीचे अल्पमुदतीचे कर्ज (एसटीएल) मंजूर व संवितरित केले होते (ऑक्टोबर १९९५) ज्याची ११ मासिक हप्त्यात २२ टक्के व्याजासह परतफेड करावयाची होती. एमआयएलने जुलै १९९६ पर्यंत मुद्दलापोटी रुपये ३३.४३ लाख प्रदान केले होते परंतु त्यानंतर मुद्दल व व्याज या दोन्हींच्या परतफेडीत कसूर केला होता. एमआयएल कडून वसूल करावयाचे येणे (मार्च २००३) रुपये ५.१३ कोटी (मुद्दलः रुपये १.१६ कोटी : व्याज व खर्चः रुपये ३.९७ कोटी) होते.

वर नमूद केलेल्या व्यवहाराच्या तपासणीत लेखापरीक्षणाला खालील अनियमितता आढळून आल्या :-

* मत्तावर कोणताही भार निर्मित न करता कर्जाचे वाटप करण्यात आले होते. परिणाम स्वरुप ज्यावेळी संस्थेने परतफेडीमध्ये कसूर केला त्यावेळी महामंडळ कोणतीही कारवाई करण्यास असमर्थ होते.

* नाथ पल्प व पेपर मिल्स मर्यादित (एनपीएमएल), औरंगाबाद या कंपनीचे ३.०५ लाख समभाग व नाथ सीडस् मर्यादित (एनएसएल), औरंगाबाद या कंपनीचे ०.९९ लाखसमभाग त्याच्या हस्तांतरणाविषयी कोणतेही करारपत्र न करता या समभागाच्या तारणावर एसटीएल संवितरित करण्यात आले होते.

* जरी हस्तांतरण करारपत्र स्वाक्षरीत केले असते तरी समभाग अपरिणामकारक प्रतिभूती ठरली असती कारण समभागांचे मूल्य फेब्रुवारी २००३ मध्ये रुपये १३.४१ लाख एवढे कमी झाले होते. समभाग हे प्रतिभूती म्हणून स्वीकार करण्याच्या पध्दतीचा पुनर्विचार होणे आवश्यक आहे.

पर्याप्त प्रतिभूती स्वीकारण्याची अत्यावश्यक पध्दतीचा अवलंब न करता कर्जाचे वितरण केल्यामुळे महामंडळ देण्यात आलेल्या कर्जाची संपूर्ण वसुली करु शकले नाही.

ही बाब शासनाला / महामंडळाला कळविली (एप्रिल २००३) होती, उत्तर मिळाले नव्हते (नोव्हेंबर २००३).

४.२ या प्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमुद केले आहे की,

१) सदर कंपनीला रु.१.५० कोटींचे लघु मुदतीचे कर्ज मंजूर करताना महामंडळाने कंपनीचा महामंडळाच्या कर्जाबाबत पूर्वानुभव विचारात घेतला होता. कर्ज मंजूर करताना महामंडळाने अशी अट घातली होती की, लघु मुदतीच्या कर्जाची फेड होईपर्यंत महामंडळाचा कंपनीच्या स्थावर मालमत्तेवरील बोजा (Charge) सोडण्यात येणार नाही. तसेच दुसऱ्या एका अटीनुसार महामंडळाच्या लघु मुदतीच्या कर्जपरतफेडीत एकदाही कसुर झाली तर कंपनी महामंडळाला आपल्या मालमत्तेवर Mortgage/Further Charge करण्यास संमती देईल.

याबाबतीत असे नमुद करण्यात येते की महामंडळाने अटींची अंमलबजावणी करण्यासाठी कंपनीबरोबर शर्थीने पाठपुरावा केला. महामंडळाने Mortgage/Further Charge करण्यासंबंधी कंपनीला पाठविलेल्या पत्राला दि.२०/५/९७ रोजी दिलेल्या उत्तरात कंपनीने असे कळविले की, कंपनीची लघु मुदतीच्या कर्जाच्या उर्वरित रकमेच्या बाबतीत स्थावर मालमत्तेवर First Pari Passu Charge देण्यास अनुमती आहे. परंतु कंपनीने Pari Passu तत्वावर महामंडळासाठी First Charge स्थापित करण्यासाठी सहा महिन्यांची मुदत मागितली. बँक ऑफ इंडिया म्युच्युअल फंडाकडुन नाहरकत प्रमाणपत्र (NOC) मिळविणे आवश्यक होते कारण बँक ऑफ इंडिया म्युच्युअल फंडाचासुध्दा कंपनीच्या स्थावर मालमत्तेवर First Charge होता. महावित्तचा मुदत कर्जाच्या बाबतीत Pari Passu Basis वर स्थावर मालमत्तेवर First Charge होता परंतु कंपनीच्या सहकार्याशिवाय महामंडळाला स्वत:हून Mortgage/Further Charge करणे शक्य नव्हते. त्यामुळे महामंडळाने दिनांक २७/९/२००० रोजी

Debt Recovery Tribunal कडे केलेल्या याचिकेत परिच्छेद ६ (F) मध्ये पुढील सवलतींची मागणी केली. "सदर कंपनीच्या (Defendants) मालमत्तांची (Assets and Properties) जाहिर लीलावाद्वारे किंवा इतर प्रकारे विक्री करुन विक्रीच्या रकमेचा विनियोग करण्याची अर्जदाराला मुभा द्यावी." येथे असेही नमुद करण्यात येते की, कंपनीची हप्त्यांच्या पुनर्बांधणीची (Reschedulement) विंनती देखील त्यावेळी महामंडळाच्या विचाराधीन होती.

२) असे नमुद करण्यात येते की, कंपनीने कोरे शेअर ट्रान्सफर फॉर्मस् सादर केले होते की, ज्यावर मे.स्वामी लिझींग अँड इनव्हेस्टमेंट प्रा.लि. या कंपनीने श्री. बसंत भागेरीया यांना २.०५ लाख शेअर्स महामंडळाकडे तारण म्हणुन ठेवण्याचा अधिकार दिला होता. तसेच सदर कंपनीच्या संचालक मंडळाचा ठराव (Board Resolution) सुध्दा देण्यात आला होता. कंपनीच्या नावावरील हे शेअर्स मे.नाथ पेपर अँड पल्प या कंपनीचे होते. त्याचप्रमाणे मे.नाथ पेपर अँड पल्प या कंपनीच्या ९६,४५० शेअरच्या बाबतीत सही केलेले शेअर ट्रान्सफर फॉर्मस महामंडळाच्या रेकॉर्डवर आहेत.

महामंडळाकडे मे.नाथ पेपर अँड पल्प मिल्स लि.चे ३,०५,००० शेअर्स Pledge करण्यात आले होते. मात्र शेअर्सवरील मालकी, शेअर्स धारकांनी महामंडळाला दिली नव्हती. महामंडळाला Pledge केलेले शेअर्स आपल्या नावावर करण्यासाठी संबंधित शेअर्स ज्या कंपन्यांचे होते त्यांच्या सहकार्याची गरज होती. ज्या कंपन्याचे शेअर्स महामंडळाकडे Pledge म्हणुन ठेवले होते त्या कंपन्याचे संचालक व पहाणी (Scrutiny) खालील कंपन्याचे संचालक परस्परांशी संबंधित होते. तसेच या कंपन्यांचे प्रवर्तकही समान होते व त्यामुळे या कंपन्यांच्या व्यवस्थापनाद्वारे, महामंडळाची शेअर्स आपल्या नावावर करण्याची विनंती, मान्य करण्यात येणार नाही अशी धारणा झाली होती.

त्यामुळे महामंडळाकडे Pledge करण्यात आलेले शेअर्स सर्टिफिकेटस् ट्रान्सफर करण्यासाठी सदर कंपन्यांकडे पाठविण्यात आले नव्हते. महामंडळ असेही सांगु इच्छितो की, जर महामंडळाने सदर कंपनीकडे ट्रान्सफरसाठी शेअर्स

सर्टिफिकेटस्  पाठविली असती तर या शेअर्सचा ताबा (Physical POssession) महामंडळाला गमवावा लागण्याचा धोका होता आणि यदाकदाचित सदर कंपनीने ट्रान्सफरसाठी नकार दिला असता तर महामंडळाला SEBI कडे तक्रार नोंदविणे भाग पडले असते व नंतर कंपनी लॉ बोर्डाकडे याचिका सादर करुन महामंडळाच्या नावावर शेअर्स ट्रान्सफर करुन घ्यावे लागले असते.  सदर प्रक्रिया दीर्घकाळ चालणारी व Litigative होती. या परिस्थितीचा विचार करुन महामंडळाने आपल्या नावावर ट्रान्सफर करण्यासाठी शेअर्स संबंधित कंपन्यांकडे न पाठविण्याचा निर्णय घेतला व त्याऐवजी दि.२७/९/२००० रोजी डी.आर.टी.(Dabt Recovery Tribunal)कडे याचिका दाखल करुन पुढील सवलती मागितल्या.

"बचावपक्षाने मे.नाथ पल्प अँड पेपर मिल्स लि. चे जे ३,०५,००० शेअर्स  तसेच मे. नाथ सीडस् लि.चे ९९००० शेअर्स जे महामंडळाकडे लघू मुदतीच्या कर्जाबाबत अतिरिक्त तारण म्हणून ठेवले आहेत त्यांची विक्री करण्यात यावी व विक्रीच्या रकमेचा विनियोग विनंती कर्त्यांच्या  (Applicants) मागणीच्या (Claim) बाबतीत करण्यात यावा."  महामंडळाकडे Pledge करण्यात आलेल्या शेअर्सच्या सद्यस्थितीच्या बाबतीत असे कळवु इच्छितो की, मे.नाथ पल्प अँड पेपर मिल्स लि.च्या ३,०५,००० शेअर्सपैकी २,७१,५०० शेअर्स महामंडळाच्या नावावर ट्रान्सफर करण्यात आले आहेत. महामंडळाकडून कंपनीच्या संचालकाकडे थकबाकीचा भरणा करण्याबद्दल, लघु मुदतीच्या कर्जाचा भरणा करण्याची मुदत संपल्यापासुन नेटाने पाठपुरावा करण्यात येत आहे. नाथ ग्रुपचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. नंदकिशोर कागलीवाल  यांनी प्रत्येक वेळी चर्चा झाली त्यावेळी थकबाकी लवकर भरण्यात येईल असे आश्वासन दिले होते, परंतु आपल्या आश्वासनांची पूर्तता त्यानी केली नाही.  त्यामुळे शेवटचा उपाय म्हणून महामंडळाने कंपनी कायदा - १९५६ च्या ४३३ व ४३४ नुसार (Ordinary Original Civil Jurisdiction at Bombay कडे (Ordinary Original Civil Jurisdiction, Company Petition No.१००४ of १९९९) दिनांक १०/९/१९९९ रोजी केले.  सदर Winding up Petition  दिनांक ९/२/२००० रोजी Proclamation of Winding दिनांक १०/३/२००० रोजी वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आले.  तसेच सदर पिटिशन

निकालात काढण्याची शेवटची तारीख २३/११/२००० ही घोषित करण्यात आली. परंतु सदर पिटिशन सुनावणी व निकालासठी अजुन पुढे आलेले नाही. DRT समोरील पिटिशन हे दिनांक २७/९/२००० रोजी करण्यात आले, परंतु सदर प्रकरण BIFR कडुन कलम २२ (i) खाली अनुमति मिळेपर्यंत स्थगित ठेवण्यात आले.

३) लघु मुदतीचे कर्ज मंजुर करण्यात आले त्यावेळी सदर कंपनी उत्तम स्थितीत चालू होती व कंपनीच्या उत्पादनाला चांगली मागणी होती. सदर लघु मुदतीचे कर्ज मंजुर करण्यात आले कारण कंपनीला कझाकिस्तानला निर्यात करण्यासाठी मोठ्या ऑर्डर्स मिळाल्या होत्या बँक अतिरिक्त खेळते भांडवल मंजूर करण्यास असमर्थ असल्याने कंपनीने महामंडळाकडे रुपये १ कोटी एवढ्या लघु मुदतीच्या कर्जाची मागणी केली.

सदर कर्ज मंजूर करुन वितरित केल्यानंतर व कंपनीद्वारे कर्ज परतफेड झाल्यानंतर कंपनीने रु. २ कोटींच्या दुसऱ्या लघु मुदतीच्या कर्जाची महामंडळाकडे विनंती केली. परंतु महामंडळाने फक्त १५० लाख रुपयांचे कर्ज देण्याचे ठरविले. सदर लघु मुदतीचे कर्ज मंजूर करताना महामंडळाने प्रत्येकी १० रु. किंमतीचे नाथ पल्प अँड पेपर या कंपनीचे ३.०५ लाख शेअर्स व नाथ सीडसचे ९९,००० शेअर्स तारण म्हणुंन स्वीकारले. नाथ पल्प व पेपर या कंपनीच्या शेअर्सचा त्यावेळी बाजारभाव रु.७१/- प्रति शेअर्स होता व सदर शेअर्स Bombay Stock Exchange वर नोदीकृत (Listed) होते. नाथ सीड्सच्या शेअर्सचा बाजारभाव रु.४५/- प्रति शेअर होता. कंपनीची स्थिती उत्तम असल्यामुळे सदर तारण महामंडळाद्वारे स्वीकरण्यात आले होते कारण मंजूर केलेल्या सदर लघु मुदतीच्या कर्जाची परतफेड एका वर्षापेक्षा कमी कालावधीत करावयाची होती व त्यावेळी अशी कल्पना नव्हती की संचालकांमध्येच वाद उत्पन्न होऊन कंपनीच्या व्यवस्थापनावर विपरित परिणाम होऊन कंपनी तोट्यात जाईल व कंपनीने तारण म्हणुन दिलेल्या शेअर्सच्या दरात प्रचंड घट होईल. कंपनी BIFR कडे २००० साली नोंदीकृत (Registered) झाली आहे व त्यापूर्वीच महामंडळाने कंपनीविरुध्द Winding up साठी मुंबई उच्च न्यायालयात दावा दाखल केला आहे. (क्र.१००४/१९९९) तसेच DRT मुंबई समोर क्र.३२३१ /२००० ही याचिका

कर्जवसुलीसाठी तारण ठेवलेल्या शेअर्सच्या विकीसाठी दाखल केली आहे. परंतु BIRF कडुन SICA च्या कलम २२ (i) खाली अनुमती मिळेपर्यंत शेअर्सच्या विक्रीवरील कार्यवाही सुरु करता येत नाही. BIRF कडुन निकाल जाहिर होईपर्यंत DRT समोरील कार्यवाही स्थगित करण्यात आली आहे.

४) असे नमुद करण्यात येते की, लघु मुदतीच्या कर्जाचे वितरण, पर्याप्त तारण स्वीकारण्यासंबंधी महत्त्वाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करुन करण्यात आले. कर्जमंजूरीच्या वेळी मे.मायो इंडिया लि.ही कंपनी चांगल्या स्थितीत चालत होती. अशी अपेक्षा होती की कंपनीचा मागील व्यवहार विचारात घेता व सदर लघु मुदतीचे कर्ज थोड्या कालावधीसाठी असल्याने कर्जाची परतफेड विहित मुदतीत होईल.

४.३ महामंडळाच्या वरील अभिप्रायाशी शासनाने सहमती दर्शविली आहे.

४.४ महामंडळाकडून व शासनाकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या संदर्भात समितीने दिनांक ४ ऑक्टोबर २००६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी, महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांनी यासंदर्भात माहिति दिली की, मायो इंडिया मर्यादित या कंपनीचे रेकॉर्ड चांगले होते म्हणून सन १९९५ मध्ये कंपनीला १०० लाखांचे लघुमुदतीचे कर्ज मंजूर केले होते त्याची पूर्णपणे परतफेड या कंपनीने केली होती. म्हणून त्यांना ऑक्टोबर, १९९५ मध्ये १५० लाखांचे दुसरे कर्ज मंजूर करण्यात आले होते. पूर्वीचा अनुभव विचारात घेऊनच कर्ज मंजूर करण्यात आले होते. तसेच लघु मुदतीच्या कर्जाची परतफेड होईपर्यंत कंपनीच्या स्थावर मालमत्तेवरील बोजा आणि कर्ज परतफेडीत कसूर झाली तर कंपनी महामंडळाला मालमत्तेवर पुढील चार्ज करण्यास संमती देईल अशा अटी घालण्यात आल्या होत्या. परंतु कंपनीने Pari Passu तत्वावर महामंडळासाठी प्रथम अधिकार स्थापित करण्यासाठी ६ महिन्यांची मुदत मागितली होती. कारण त्यांना बँक ऑफ इंडिया म्युच्यूअल फंडाकडून ना हरकत प्रमाणपत्र मिळवावयाचे होते. म्युच्युअल फंडाचासुध्दा कंपनीच्या स्थावर मालमत्तेवर प्रथम अधिकार होता. हीच कर्ज वसूल करण्यातील मुख्य अडचण नंतर ठरली. जो प्रथम कर्ज देतो त्याचा अधिकार प्रथम असतो हे स्पष्ट असताना कर्ज कसे काय मंजूर केले या समितीच्या प्रश्नावर व्यवस्थापकीय संचालकांनी सांगितले की,

कंपनीला कर्ज दिले त्यावेळी त्यांचे २६० लाखांचे शेअर्स महामंडळाने घेतले होते. शिवाय महामंडळाचा कंपनीवर जो अधिकार होता तो कायम ठेऊन व अतिरिक्त तारण घेऊन दुसरे कर्ज देण्यात आले होते.

यासंदर्भात सर्वसाधारण चर्चेला उत्तर देताना व्यवस्थापकीय संचालकांनी सांगितले की, महामंडळाने आतापर्यंत २४७५ कोटी रुपयांचे कर्ज वाटप केले आहे. त्यापैकी ३१३ कोटी रुपयांची अनियमितता थकीत वसूली व्हावयाची आहे व बाकी रक्कम वसूल झालेली आहे ही थकित रक्कम बुडीत व्हावयाची शक्यता आहे काय ? या प्रश्नावर सांगण्यात आले की, एकदम तसे सांगता येणार नाही. पण ५० टक्क्यापेक्षा कमी रक्कम वसूलीची बाकी असेल व त्यांची मालमत्ता पाहूनच महामंडळाला वसूलीबाबत ठरविता येईल. तसेच रु.३१३ कोटी मुद्दल रकमेवर ९८२ कोटी रुपये व्याज आहे. यामध्ये दंडव्याजाची रक्कम अंतर्भूत असल्याने व्याजाची रक्कम मोठी दिसत आहे. एकूण जवळपास रु.१३००/- कोटी येणे वसूल करावयाचे आहे.

४.५ **अभिप्राय व शिफारशी :-**

या प्रकरणी समितीला मिळालेली लेखी माहिती व साक्षीच्या वेळी मिळालेली माहिती विचारात घेता असे दिसून येते की, महामंडळाने मायो इंडिया मर्यादित या कंपनीला थकीत कर्जाचे ४० लाख रुपये वजा करुन घेऊन रु.१.१० कोटीचे अल्पमुदतीचे कर्ज ऑक्टोबर १९९५ मध्ये मंजूर व वितरीत केले होते. कंपनीने मुद्दलापोटी रु.३३.४३ जुलै १९९६ पर्यंत परतफेड केले होते. कंपनी पुढे कसूरदार ठरली. वसूल व्हावयाचे येणे मुद्दल व व्याजासह रु.५.१३ कोटी होते. कर्ज मंजूर करतांना महामंडळाने योग्य ती काळजी न घेतल्याने कंपनी विरुध्द वसूलीबाबत कारवाई करता आली नाही. महामंडळाचा कंपनीच्या स्थावर मालमत्तेवर अधिकार होता. परंतु त्यावर प्रथम अधिकार बँक ऑफ इंडियाच्या म्युच्युअल फंडाचा होता हे माहित असतानाही कंपनीने कर्ज मंजूर करुन वितरीतही केले होते व हीच मुख्य चूक केल्याने महामंडळाचे कर्ज वसूल होऊ शकले नाही. तारणापोटीही कंपनीचे शेअर्स सुध्दा महामंडळाक्डे होते परंतु त्यांची किंमत कमी झाल्याने आणि महामंडळाकडे शेअर्सची मालकी नसल्याने कर्जाची रक्कम वसूल करता आली नाही. याबाबत

न्यायालयात प्रकरण प्रलंबित असल्याने शेअर्सची विक्री देखिल करता येत नाही. समितीच्या मते महामंडळाच्या अधिकाऱ्यांचाच निष्काळजीपणाच याला कारणीभू असून त्यामुळेच हा सर्व तोटा झालेला आहे. जनतेच्या पैशाची ही केवळ उधळपट्टीच नव्हे तर एक प्रकारचा अपहारच आहे. याला पूर्णपणे महामंडळाचा अधिकारी वर्ग आणि संचालक मंडळही जबाबदार आहे. कारण नियमांचे सरळ-सरळ उल्लंघन होत असतानाही संचालक मंडळाने त्याकडे दूर्लक्ष केले. समितीच्या मते या गैरव्यवहारात त्यांचाही सहभाग असावा अन्यथा अशा प्रकारच्या कर्जवाटपास त्यांनी संमती दिलीच नसती. समितीच्या मते तारण म्ळणून शेअर्स स्वीकारण्याची कार्यपध्दती केवळ चूकीचीच नसून अत्यंत घातक आहे. अन्य एका प्रकारणामध्ये देखिल तारण म्हणून शेअर्स स्विकारल्यामुळे व नंतर त्या शेअरचा बाजारभाव घसरल्यामुळे महामंडळास फार मोठ्या रकमेस मूकाचे लागले आहे. **<u>त्यामुळे समितीची आग्रहाची शिफारस आहे की, तारण म्हणून शेअर्स स्विकारण्याची कार्यपध्दती महामंडळाने त्वरीत बंद करावी.</u>** दूसरे असे की, तारण म्हणून जी मालमत्ता महामंडळाकडे गहाण ठेवली त्यावर केवळ महामंडळाचाच चार्ज असला पाहिजे अन्य व्यक्तिकडे संस्थेचा चार्ज असला तर प्रस्तूतच्या प्रकारणाप्रमाणे वसूली करणे महामंडळास कदापिही शक्य होणार नाही. महामंडळाव्यतिरिक्त अन्य व्यक्तिचा वा संस्थेचा हक्क असणारी मालमत्ता तारण म्हणून स्विकारणे मूळातच चूकीचे आहे. **<u>महामंडळाने या संबंधात धोरणात्मक निर्णय घ्यावा अशी समितीची शिफारस आहे. या प्रकरणाची महामंडळाने खास अधिकाऱ्यामार्फत पूनश्च चौकशी करुन यामध्ये जे-जे दोषि असतील त्यांचे विरुध्द कडक कारवाई करावी व वेळप्रसंगी त्यांचे मालमत्तेवर न्यायालयामार्फत टाच आणून त्यांचेकडून महामंडळाचे झ ाालेले नुकसान वसूल करुन घ्यावे. या महामंडळाचे कर्ज वितरणाचे कामकाज सद्या पूर्णत: बंद असून केवळ वसूलीचे काम चालू आहे. साधारणत: मुद्दल आणि व्याज मिळून जवळपास रु.१३०० कोटी वसूल करावाचे आहेत. ही सर्व वस्तुस्थिती विचारात घेता समिती अशी शिफारस करते की, ही सर्व रक्कम वसूल करण्यासाठी महामंडळाने युध्दपातळीवर प्रयत्न करावे. वेळप्रसंगी निष्णात वकिलांची नेमणूक करुन जलदगतीने</u>**

<u>दावे निकालात काढण्याचा प्रयत्न करावा. याबाबत केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन महिन्यात सादर करावा.</u>

---

-----------------------------------------------------

# बैठकींचे परिशिष्ट

-----------------------------------------------------

## बुधवार, दिनांक ४ ऑक्टोबर, २००६ विधानभवन, मुंबई.

## उपस्थिती.

१. श्री. नाना पटोले, वि.स.स. तथा समिती प्रमुख.

**सदस्य**

(२) श्री. सुरेश वरपूडकर, वि.स.स.
(३) श्री. रमेश कदम, वि.स.स.
(४) श्री. बंडूभाऊ सावरबांधे, वि.स.स.
(५) श्री. हरिदास भदे, वि.स.स.
(६) श्री. अरविंद नेरकर, वि.स.स.
(७) श्री. उत्तमप्रकाश खंदारे, वि.स.स.
(८) श्री. अरुण पाटील, वि.स.स.
(९) डॉ. विनय नातू, वि.स.स.
(१०) श्री. सदाशिवराव पोळ, वि.प.स
(११) श्री. अरविंद सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. ज्ञा.म.गवळी, समिती अधिकारी

**महालेखाकार (वाणिज्यिक) लेखा परिक्षा**

१) श्री.के.एल. करमुडी, उपमहालेखापाल
२) श्री.पी.पी.लोणकर, वरिष्ठ लेखाधिकारी

**साक्षीदार**

**उद्योग, उर्जा व कामगार विभाग**

१) श्री.व्ही.के. जयरथ, सचिव.
२) श्री. प्रितम आठवले, सहसचिव

**महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ**

१) श्री. समिर बिश्वास, व्यवस्थापकीय संचालक,
२) श्री. अय्यर, उपमहाव्यवस्थापक

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००२-२००३ च्या (वाणिज्यिक) अहवालातील महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाच्या परिच्छेदासंबंधात विभागीय सचिवांची तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

## ------ार, दिनांक ----नोव्हेंबर, २००६ विधानभवन, मुंबई.

## उपस्थिती.

**समिती प्रमुख**

(१) श्री. नाना पटोले, वि.स.स. तथा समिती प्रमुख.

**सदस्य**

(२)
(३)
(४)
(५)
(६)
(७)
(८)
(९)
(१०)
(११)
(१२)
(१३)
(१४)
(१५)
(१६)
(१७)
(१८)
(१९)
(२०)
(२१)
(२२)

* (२३)

(२४)

(२५)

**<u>महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय</u>**

श्री. दि.वि.चोघले, अतिरिक्त सचिव,

श्री. डी.एम.गवळी, समिती अधिकारी.

समितीने प्रारुप अहवालाच्या मसुद्यांवर विचार करुन तो काही सुधारणांसह संमत झाला.